न. ग्रं. सं. ठाणे
विषय कादंबरी
सं. क्र. १७८८८
१९८०८



REFBK-0017782

# गांधीजींच्या सहवासांत

संकलक

पुंडलीकजी कातगडे

REFBK-0017782

अरुणराज प्रकाशन मुंबई २

प्रकाशक :
डॉ (सौ.) **मीना पै**
'अरुणराज प्रकाशन'
१४८ एच्. भीमराव वाडी,
ठाकूरद्वार रोड, मुंबई २
४४
मुद्रक :
**चिंतामण वामन जोशी**
माधव प्रिंटिंग प्रेस, अलिबाग
४४
आवृत्ति पहिली जानेवारी १९७०
४४
**किंमत दीड रुपया**
४४
लेखकाचा पत्ता :
**पुंडलीकजी कातगडे**
समदेव गल्ली, बेळगांव

# अनुक्रम

अनुक्रम ०९३७० चरित्र ९३।३।७० १४७८

आठवणी
१ : पित्याचें पुत्रप्रेम ७
२ : स्वामीं सत्यमेव व नागाची हत्या ८
३ : सत्याचरणामध्यें कोणत्या गोष्टी येतात ? ८
४ : रसिकभाईचें प्रतिज्ञापालन ९
५ : संपादकत्वाची लायकी व निवड १०
६ : हरिजनानें पंगत काढण्यास स्त्रियांची हरकत ११
७ : पंगत वाढतांना मुलांशीं खेळणें १२
८ : गांधीजी व संगीत १३
९ : बॅ. सावरकरांचीं जप्त पुस्तकें १४
१० : गांधीजी व प्रार्थनेंतील साप १४
११ : गांधीजी, द्राक्षें आणि लहान मुलगा १५
१२ : घरून पळून आलेला एक विद्यार्थी १६
१३ : निपाणींतील सोसाट्याचा वारा व तंबाखूची मुकटी १६
१४ : You are the slave of the machine १७
१५ : अंग्रोली मुक्कामांतील धोती-पोती आणि शीर्षासन १८
१६ : कार्यकर्त्यांच्या भावनांची जपणूक १९
१७ : लवंगांची मुकटी व गांधीजी २०
१८ : ते मला सोमवारी प्रश्न विचारतात २१
१९ : मालविजयी असें न सांगतील तर दुसरें कोण सांगेल ? २२
२० : गांधीजीको बाहर बिठानेवाला पट्टेवाला २३
२१ : हुदलींतील टेकडीवरील मंदिर २५
२२ : गंगाधररावांना सुचलेलें उत्तरहि तुला देतां आलें नाहीं २५
२३ : आश्रमाच्या कुलुपांच्या किल्ल्या मिळाल्या काय ? पाहा ना ? २७
२४ : 'गांधीजी की नींद न तोडे' २८
२५ : फैजपूर कॉंग्रेसमधील आठवण २९
२६ : पहाटेची घंटा वाजविण्याचें काम आपल्याला दिलें आहे ३१
२७ : स्वार्थाला कांही तरी मर्यादा घालशील कीं नाहीं ? ३३
२८ : शेवटी महाराष्ट्रीय तो महाराष्ट्रीय, जोड्याजवळ बसणार नाहीं ! ३४
२९ : यालाच म्हणतात 'योग कर्मसु कौशलम्' ३५
३० : ही बुद्धि चांगल्या मार्गाला लागली तर या लोकांचें व देशाचें किती कल्याण होईल ? ३६
३१ : गांधीजी आणि घातपात ३७
३२ : गांधीजींच्या संदेशांच रेकार्ड घ्यावें व त्याचा चोहोंकडे प्रचार करावा ३९

# आपापल्या कुवतीप्रमाणे प्रत्येकानें बोध घ्यावा.

कोणाहि महान् युगपुरुषाचें चरित्र कितीहि अभ्यासपूर्वक व कितीहि कोणीहि प्रामाणिकपणें लिहिलें तरी, त्यांत लेखकाची विचारसरणी व जीवन यांची छाया थोडीतरी डोकावल्याशिवाय राहणार नाहीं. पण भिन्नभिन्न प्रसंगींच्या महात्म्यांच्या केवळ आठवणी लहानथोरांना सांगून, त्यावरून त्या महापुरुषाचें मन, बुद्धि व जीवनसिद्धान्त यांचा ठाव घेण्यास अथवा त्यांच्या राहणी-करणी-विचारसरणीचें मूल्यमापन करण्यास प्रत्येकाला स्वतंत्रता व मुभा ठेविली जावी, लोकांनीं त्या आठवणी समजून घेऊन आपापले निष्कर्ष आपआपल्या पुरते काढावेत व जरूर तर खोल चिंतनानंतर ते बदलावेत वा अधिकाधिक स्पष्ट होत राहावेत आणि त्यापासून योग्य तो बोध घ्यावा, हाच सर्वांत त्यांतल्या त्यांत सुरक्षित मार्ग आहे. श्री. सदाशिवराव बापट यांनीं लोकमान्य टिळकांच्या आठवणींचे जे तीन बहुमोल ग्रंथ लिहून ठेविलेले आहेत, त्या आठवणींमधून जे टिळक प्रत्येकाला दिसतील, तेच त्याच्यापुरते त्याचे 'टिळक' होत. त्या आठवणींच्या तीन ग्रंथांच्या आधारें लोकमान्यांचें एक चरित्र लिहिलें जाईल तर उत्तमच होईल.

या दृष्टीनें मी महात्माजींच्या कांहीं आठवणी या पुस्तिकेमध्यें ग्रथित केल्या आहेत. कर्नाटकसिंह स्वराज्यधुरंधर कै. गुरुवर्य गंगाधरराव देशपांडे यांच्या अंतेवासित्वामुळें व माझ्या पूर्वपुण्याईमुळें मला लोकमान्य व महात्माजी या दोन्ही युगपुरुषांचा निकट सहवास लाभला व त्यांना अगदीं जवळून पाहावयास व अभ्यासावयास सुसंधी मिळाली. त्यापैकी महात्माजींचीं कांहीं संस्मरणें मी या पुस्तिकेमध्यें नमूद केलीं आहेत.

—पुंडलीकजी कातगडे

गांधीजयंती १९६९

# श्री. पु. ल. देशपांडे यांचें प्रोत्साहन

'गांधीजींच्या सहवासांत' ही पुस्तिका मी समग्र वाचून पाहिली आहे. लहानथोर सर्वांच्या हातीं ही पुस्तिका जावी असें मला वाटल्यामुळें मीच श्री. पुंडलीकजींना या आठवणी पुस्तिकेच्या रूपानें प्रकाशित करविण्याची सूचना आग्रहानें केली होती. विद्यार्थी-विद्यार्थिनी व इतर लहान-थोरांनीं या आठवणी वाचाव्यात व त्यापासून बोध घ्यावा अशी माझी इच्छा आहे. श्री. पुंडलीकजी कातगडे यांनीं या आठवणी तातडीनें लिहून काढल्याबद्दल मला आनंद वाटावा, इतका माझा व त्यांचा गाढ स्नेह आहे. आणखीहि अशाच कांहीं आठवणी लिहितां येण्यासारख्या असल्यास त्या पुंडलीकजींनीं अवश्य लिहाव्यात.

गांधीजयंती सन १९६९

—पु. ल. देशपांडे

अनुक्रम

# लेखकाचा परिचय

लोकमान्यांचा 'केसरी' शाळेंत आणविल्याबद्दल शाळेतून हकालपट्टी झालेले....राष्ट्रीय कीर्तनकार डॉ. दत्तोपंत पटवर्धन यांच्यामागें कीर्तनामध्यें साथ करणारे....कर्नाटकसिंह गंगाधरराव देशपांडे यांचा सतत ४८ वर्षे सहवास लाभलेले....पिता-पुत्र, गुरु-शिष्य, नेता-अनुयायी, स्नेही-सल्लागार, विश्वस्त-सेवक, सहकारी असें नातें पुंडलीकजी व गंगाधरराव यांचें.... मिरज संस्थानांतील साराबाढ व रयतांचा सत्याग्रह या यशस्वी आंदोलनांचे एक प्रणेते....चंपारण्यांतील ( बिहार ) सत्याग्रह आंदोलनांतील गांधी आश्रमाचे संचालक व गांधी प्रतिनिधि....बिहारमधून ( under Defence of India Act ) हद्दपार झालेले.... साबरमती सत्याग्रहाश्रमातील शिक्षण पुरें केलेले.... साबरमती ते मुंबईपर्यंत एकटेच गांधीजींच्या आज्ञेप्रमाणें पायीं प्रवास केलेले....अंधेरी येथील 'साधकाश्रमाचे' संचालक व व्यवस्थापक....सन १९१५ ते १९६० पर्यंत बेळगाव जिल्हा काँग्रेस कमिटीचे एक जबाबदार कार्यकर्ते....स्वातंत्र्याच्या सर्व आंदोलनांत बिनीवर राहून तुरुंगवास भोगलेले....अखिल भारतीय अस्पृश्यता निवारण समितीचे चिटणीस ( सन १९३०-३१ )....सतत तीस-चाळीस वर्षे गांधीजींचा संपर्क लाभलेले ....बेळगांव येथील स्वराज्याश्रमाचे संचालक....बेळगांवांतील दुय्यम राष्ट्रीय शाळेंतील एक शिक्षक....हुदली (जि. बेळगांव) येथें गंगाधरराव देशपांडे यांनीं चालविलेल्या स्वराज्याश्रमांची धुरा वाहणारे....बेळगांव जिल्ह्यांतील आद्य हिंदी प्रचारक....सत्यबोध विद्यालय सतत १४ वर्षे पत्रव्यवहाराद्वारें चालविणारे....गांधी सेवा संघाचे एक सदस्य...बेळगांव जिल्ह्यांतील विधायक कार्याचे एक प्रणेते...लहानपणापासून व्यायाम-प्रेमी आणि मिरज ( महाराष्ट्र ) येथील प्रसिद्ध श्रीअंबाबाई तालीम संस्थेचे एक संस्थापक....गीतारहस्य सिद्धांत 'कर्मयोग' प्रचारार्थ महाराष्ट्र व अन्य प्रांतांमध्यें संचार करणारे गीताप्रवचनकार ( १९२५,२६ )........हरिजनसेवार्थ अहिंसक चर्मालय चालविणारे... म्हैसूर—महाराष्ट्र सीमावाद आंदोलनांतील एक कट्टर मराठी नेते....सीमावाद सोडवणुकीसाठीं कर्मयोगी सेनापती बापट यांच्याबरोबर बेमुदत उपवास करण्यास बसलेले....गांधी तत्त्वज्ञानाचे एक अभ्यासू....सन १९३४-३५ मध्यें बिहारच्या भूकंपग्रस्तांच्या सेवेसाठीं एक वर्ष गांधीजींनीं मुझफरपूर जिल्ह्यांत पाठविलेले...सन १९४२ सालांतील भूमिगत कार्यकर्त्यांपैकीं एक...अशा विविध धकाधकीच्या जीवनक्रमांतूनहि वेळांत वेळ काढून २२ पुस्तकें लिहिणारे...या आठवणी सांगणाऱ्यांचा असा हा थोडक्यांत परिचय आहे.

—प्रकाशक

# गांधीजींच्या कांहीं आठवणी

७७८२

आठवण क्र. १ :

## पित्याचें पुत्रप्रेम

गांधीजींच्या वाङ्मयानें आणि अनेकविध चळवळींनी भारून गेल्यामुळें, श्री. ××××× या नांवाचा एक ग्रॅज्युएट साबरमती आश्रमांत दाखल झाला होता. त्याच्या वडीलांनी गांधीजींना पत्र लिहिलें होतें कीं, “ माझ्या मुलाला फूसलावून आपण आपल्या आश्रमांत नेलेला आहे, असें मला कळतें. त्याला घरीं परत पाठवा. आपण तसें न कराल तर आपल्याला पोलिसाच्या ताब्यांत मला द्यावें लागेल.” त्या बिचाऱ्या सज्जन मनुष्यास गांधी, गांधींचें कार्य व साबरमती आश्रम म्हणजे काय चीज आहे, हें मुळींच माहित नव्हते. गांधीजींनीं त्याच्या पत्राला उत्तर लिहिलें कीं, ‘ आपल्या मुलाला मी आश्रमांत बोलाविलेलें नाहीं किंवा घेऊन आलों नाहीं. मी कोणासही आश्रमांत बोलावत नसतो. माझ्या आश्रमांत राहाण्याची इच्छा आपल्या चिरंजिवास असेपर्यंत, आणि आश्रमांतील सर्व नियमांचें पालन त्याच्या हातून होत असेपर्यंत मी त्याला आश्रमांतून हाकलून देऊं शकत नाहीं. आपण स्वतः येऊन त्याला घेऊन जाऊं शकता. मी आपल्याला त्या कामीं मदतच करीन. ” अशा तऱ्हेचें पत्र मुलाच्या वडिलांनी लिहिणें त्यांच्या पुत्रप्रेमाचे द्योतक आहे व तें बरोबरहि आहे असेंच गांधीजींना वाटत होते. ×××××× चे लग्न थोड्याच दिवसांपूर्वी झालें होतें.

श्री. ×××××च्या वडीलांनी विचार केला कीं, आपल्या मुलाच्या पत्नीलाच त्याचें मन वळवून घरीं बोलावून आणण्यास पाठवावें. त्याप्रमाणें ×××××ची पत्नी साबरमती आश्रमांत येऊन दाखल झाली व आपल्या पतीचें मन वळविण्याची तिनें शिकस्त केली. रोज त्यांचा वादविवाद चालत असे व भांडणतंट्यापर्यंत मजल जात असे. तिच्या या प्रयत्नामध्यें १०।१५ दिवस गेले, पण या कालावधींत, आश्रमांतच राहावें व समाजसेवेला आपलें जीवन अर्पण करावें असें तिलाहि वाटूं लागले. तसा दोघा पती-पत्नींनी आपला अभिप्राय व शेवटचा निर्णय ××××च्या वडीलांना कळविला. तेव्हां ××××चे वडील स्वतःच, आपले चिरंजिव व सून यांचीं मनें वळवून त्यांना घरीं घेऊन

जाण्यास आश्रमांत आले. या तिघांचीहि चर्चा गांधीजींबरोबर होत असे.

आश्रमांतील वास्तव्यानें व वातावरणामुळें आणि गांधीजींशीं होत असलेल्या चर्चेचा परिणाम म्हणून ×××××च्या वडीलांनाहि वाटू लागलें कीं आपणहि आश्रमांत राहावें, एक नम्र समाजसेवक बनावें व जीवनाचें सार्थक करावें.

□□□

**आठवण क्र. २ :**

## स्वामी सत्यदेव व नागाची हत्या

प्रसिद्ध देशसेवक संन्यासी स्वामी सत्यदेव कांहीं दिवस साबरमती आश्रमांत राहावयास आले होते. त्यावेळीं आश्रमांतील एका कुटुंबाच्या घरीं एक नाग निघाला होता. त्या घराच्या न्हाणीघरांतील मोरीमध्यें तो घुसून बसला होता. स्वामी सत्यदेवांना ही गोष्ट समजतांच ते त्या घरीं गेले व त्या मोरीच्या दोन्हीं तोंडांना गुडद्या मारून स्वामी सत्यदेवांनीं त्यांत उकळतें पाणी ओतून त्या नागाला मारून टाकले. ही गोष्ट गांधीजींना मुळींच आवडली नव्हती. असल्या लोकांना साबरमती आश्रमांत स्थान नाहीं ही गोष्ट सर्वांनाच समजली पाहिजे असें गांधीजी बोलले होते. आश्रमांत प्रार्थनोत्तर होणाऱ्या आपल्या भाषणांत गांधीजींनी आपलीं हीं मतें सांगूनहि टाकलीं होतीं. या घटनेनंतर सत्यदेव पुन्हां आश्रमांत आले नाहींत.

□□□

**आठवण क्र. ३ :**

## सत्याचरणामध्यें कोणत्या गोष्टी येतात ?

गांधीजींशीं चर्चा करणें धोक्याचें असें. त्यांच्या उत्तरामध्यें प्रश्न विचारणाऱ्यावर कांहीं साधना करण्याची जबाबदारी येऊन पडत असे. मी एकदां त्यांच्याबरोबर फिरावयास गेलो असतांना त्यांना प्रश्न विचारला होता कीं, ‘ सत्याचरणामध्यें कोणत्या गोष्टी येतात ? ’ तेव्हां गांधीजी म्हणाले, ‘ आपल्या स्मरणशक्तीला चांगला ताण देऊन, गत आयुष्यांतील अनेक प्रसंग आठवून आपण ज्यांच्यापाशीं असत्य भाषण किंवा असत्याचरण केलें असेल त्यांना त्या त्या प्रसंगाचें स्मरण देऊन आपण त्यांच्याशीं असत्य भाषण किंवा असत्याचरण केल्याचें कबूल करावें. ’ मी याचा कांहीं दिवस विचार करीत होतो. मला अनेक प्रसंग आठवूं लागले. पण माझी छाती होईना ! शेवटीं केवळ

गंगाधरराव देशपांडे यांना पत्र लिहून त्यांच्याशीं मी कोठें कोणत्या प्रसंगीं काय काय खोटें बोलला, याची यादी पाठविली होती.

□□□

**आठवण क्र. ४ :**

## रसिकभाईचें प्रतिज्ञापालन

एकदां गांधीजींचे नातू रसिकभाई यांनीं ते अगदीं लहान असतांना पंक्तीमध्यें तूप अधिकचें मागितले होतें. पंगत वाढण्याचें काम त्या दिवसांत स्वतः गांधीजीच करीत होते. गांधीजींनीं त्याला अधिक तूप वाढलें नाहीं. ते त्याला कांहीं गोष्टी समजावून सांगत होते, पण त्या लहान मुलाला त्या गोष्टी समजण्यासारख्या नव्हत्या. ते त्याला सांगत होते कीं, ‘ आपण आश्रमांत जो पैसा खर्च करतो तो सार्वजनिक पैसा आहे. तो फार बेतानें, विचारपूर्वक व काळजीनें खर्च केला पाहिजे. तुला अधिकचें तूप वाढलें तर मला सर्वांना तसें वाढावें लागेल. कारण हीं सर्व माणसें व मुलें मला तुझ्याइतकींच जवळचीं आहेत. मी पंक्तिप्रपंच केल्यास त्या एका स्वतंत्र पापाचा मी धनी होईन. सर्वांना अधिकचें तूप वाढल्यास तो सार्वजनिक पैशाचा अपव्यय व उधळपट्टी होईल म्हणून मी तसेंहि करूं शकत नाहीं.’ अशा प्रकारें नातवाला उद्देशून गांधीजी बोलूं लागले पण रसिक आपला हट्ट सोडीना ! रसिकनें, ‘ मी आज सायंकाळपर्यंत उपवास करणार आहे.’ असें बोलून पुढील वाढलेलें ताट बाजूस सरकविलें. गांधीजींनीं मग तें ताट मुकाट्यानें उचलून नेलें. पुढें तास दोन तास झाल्यानंतर रसिकला विशेष भूक लागल्यामुळें तो तुपाशिवायहि जेवण्यास तयार झाला. तरीं गांधीजींनीं त्याला सायंकाळपर्यंत जेवण दिलें नाहीं. प्रतिज्ञा एकदां केल्यानंतर ती मोडूं नये असेंच रसिकच्या मनावर बिंबविण्याचा गांधीजींनीं प्रयत्न केला. आज जरीं त्या लहान मुलाला कांहीं समजत नसलें तरी त्याच्या मनावर त्याचें चांगले संस्कार होतात, हीच भावना त्याच्या बुडाशीं होती. या बाबतींत रसिकच्या वतीनें कस्तुरबांनीं केलेली मध्यस्थी रसिकच्या मदतीला फलद्रुप होऊं शकली नाहीं. त्या दिवशीं रसिकबरोबर त्याच्या आजोबांनी म्हणजे गांधीजींनीहि सायंकाळपर्यंत उपवास केला होता. रसिकला दोन प्रहरचे व सायंकाळचें मिळून तूप मिळालें होतें !

□□□

**आठवण क्र. ५ :**

## संपादकत्वाची लायकी व निवड

'नवजीवन' पत्राचा मराठी अवतार सुरू करावा असें जवळ जवळ नक्की झालें होतें. त्या मराठी 'नवजीवन'साठीं त्यांना एक संपादक पाहिजे होता. बेळगांवचे श्री. गंगाधरराव देशपांडे व बडोद्याचे श्री. केशवराव देशपांडे यांनी एका श्री. ××× नांवाच्या योग्य लेखकाची संपादक म्हणून निवड करून, त्यांना गांधीजींकडे शिफारस करून पाठविलें होतें. साबरमतीस पं. खरे यांच्या बिऱ्हाडींच ते उतरले होते. मराठी 'नवजीवन' सुरूं करण्याच्या कल्पनेला मूर्त स्वरुप येण्याला अद्यापि अवधी होता. गांधीजी दोन तीन दिवसानंतर जालियनवाला बागेमध्यें अत्याचारांविषयींच्या कमिटीच्या कामासाठीं पंजाबांत जाणार होते. श्री. ××× यांना गांधीजींनी प्रथम चारसहा महिनेपर्यंत आश्रमातील कामें समजावून घेण्यास आणि 'नवजीवन' गुजरातीचा अनुभव घेण्यास सांगितलें. आश्रमांत राहावयाचें म्हणजे तेथील कामामध्यें यथाशक्ती आणि व्यवस्थापकाच्या आज्ञेप्रमाणें राबत राहावयाचें व त्यात जो अनुभव मिळेल तें खरें शिक्षण! हा अर्थ श्री. ××× यांना अद्यापी कळायचा होता. व्यवस्थापक मगनलालजींची भेट व्हावयाची होती. श्री. ××× यांनी आश्रमांत मध्यंतरीच्या अवधींत राहाण्याचें कबूल केलें. अर्थात नियमाप्रमाणें काम मागून घेण्यास त्यांना व्यवस्थापक श्री. मगनलालजींकडे जावेंच लागलें. त्यांना रोज दोन वेळा आश्रमांतील स्वयंपाकगृहांत काम करण्याची आज्ञा झाली. ते ऐकल्यानंतर श्री. ××× आश्रमांत भोजनासहि आले नाहींत. मीच त्यांच्यासाठीं पान वाढून खोलीवर नेत असे. त्यानंतर त्यांनीं श्री. मगनलालजी यांच्याकडे जाऊन थोडी चर्चा केली.

'मला स्वयंपाकगृहांत काम करण्याचें कोणत्या हेतूनें सांगण्यांत आले? आणि हें काम मी किती दिवस करावयाचे आहे?' श्री. ××× यांनी विचारले. श्री. मगनलालजी 'येथील सर्व कामांतून प्रत्येक माणसानें गेलेलें असावें या हेतूनेंच मी बापूजींना विचारून आपल्याला स्वयंपाकगृहांतील काम दिलें आहे, तेथें पुष्कळ मंडळी कामाला असतात; त्यांत आपण एक! त्यांत आपल्याला त्रास होणार नाहीं. आणि बापूजी पंजाबहून परत येईपर्यंतच आपण हें काम करायचे आहे.' श्री. ××× — 'पंजाबहून परत येण्यास गांधीजींना किती दिवस लागतील?

श्री. मगनलालजी– ' ते आज कांहीं सांगतां येत नाहीं; पण महिन्या दोन महिन्यांत परत येतील असें वाटते.'

श्री. ×××– ' मला त्यांत शिकण्यासारखे नवीन असें कांहींच नाहीं. मला स्वयंपाक चांगला करतां येतो. मोठा म्हणजे पुष्कळ लोकांचाही स्वयंपाक मी केलेला आहे. यापेक्षां मला दुसरें कांहींतरी काम द्या. '

श्री. मगनलालजी– ' छान ! मग तर उत्तमच झालें. रसोड्याचें काम पुरणाऱ्यांना आपल्याकडून पुष्कळ शिकतां येण्यासारखे आहे. आमचे तर रसोड्यामध्यें प्रयोगच चालले आहेत. '

ही गोष्ट त्याच दिवशीं गांधीजींना कळविण्यांत आली. त्यांनी श्री. ××× यांना आपल्याकडे बोलावून घेऊन त्यांचे म्हणणें ऐकून घेतले व त्यांना चार महिने विणकाम शिकण्यास सांगितले. हा बदलही श्री. ××× यांना आवडला नव्हता. तथापि गांधीजींच्या समोर कांहीं उत्तर न देतां, थोडें कुरकुरतच होकार व्यक्त करून ते परत आले होते त्यानंतर ते दोनतीन दिवस आश्रमांत होते. फक्त इकडे तिकडे हिंडून व झोंपून हे वेळ घालवीत होते. मराठी ' नवजीवन 'च्या संपादकत्वाला या सर्व कामांच्या अनुभवाची काय आवश्यकता आहे ? असें त्यांना वाटत होते. व अनेक आश्रमियांपुढें तसें ते बोलूनही दाखवीत होते. एके दिवशीं सायंकाळच्या गाडीनें ते मुंबईस परत गेले व पुन्हा, आश्रमांत आले नाहींत. पंजाबहून गांधीजींचें पहिलें पत्र आश्रमांत आलें, त्यांत त्यांनीं, ' श्री. ××× अजून आश्रमांत आहेत काय ? ' अशी पृच्छा केली होती.

**आठवण क्र. ६ :**

## हरिजनानें पंगत वाढण्यास स्त्रियांची हरकत

आश्रमामध्यें अस्पृश्यता मानित नाहींत हें जाहिरच होतें. त्यामुळें आश्रमांत येणाऱ्या हरिजनांना चारदोन दिवसांत आश्रमांत मिसळून जातां येत असे. विणकामांत अनेक शोध व प्रयोग त्यावेळीं आश्रमांत चालत असल्यानें हरिजन विणकर आश्रमांत वारंवार आणिले जात असत. एकदां एक वृद्ध हरिजन विणकर आश्रमांत कांहीं दिवस रहाण्यासाठीं मुद्दाम बोलाविला होता. तो हातमागावर दिवसाला चार वारांपेक्षां जास्त कापड विणून दाखवीत असे.

आपल्याला येथें अस्पृश्य मानलें जात नाहीं हें पाहून त्या विणकरानें एक दिवस पंक्तीमध्यें वाढण्याच्या कामालाच हात घातला. ही गोष्ट आश्रमांतील स्त्रियांना पसंत पडली नाहीं. त्या स्त्रियाही हरिजनांना अस्पृश्य मानीत नव्हत्या. तथापि त्यानें आपल्या अन्नामध्यें हात घातलेला त्यांना पसंत नव्हता. त्याला त्यांनी तसें करूं दिले नाहीं, पण त्या पंक्तीमध्यें जी जाणती व तत्वनिष्ठ माणसें होती त्यांना ही अपृश्यता व स्त्रियांची हरकत सिद्धांताविरुद्ध वाटली. त्या दिवशीं स्त्रियांनी दोन प्रहरचें जेवण घेतलें नाहीं आणि इतरांनी या प्रश्नाचा निर्णय लागल्यावांचून भोजनास सुरुवात करावयाची नाहीं असें ठरविलें. त्या दिवशीं पंगत वाढण्याचें काम करण्यास गांधीजी आले नव्हते. त्यांना कांहीं तरी महत्वाचें काम त्यावेळीं असावें. ही गोष्ट गांधीजींना कळवावी व त्यांच्या आज्ञेप्रमाणें वागावें, त्यांच्याकडून निर्णय येईपर्यंत भोजनास सुरुवात होऊं नये असें पंक्तींतील सर्वांनीं ठरविलें.

'त्या हरिजन विणकराला पंगत वाढण्याचें काम करण्यास मुळींच हरकत नाहीं. आणि ही गोष्ट ज्यांना पसंत नसेल त्यांना आश्रमांत राहण्यास जागा नाहीं.' हा गांधीजींचा निर्णय पंक्तीत सांगण्यांत आल्यानंतर पंगत भोजनास बसली. स्त्रियांनींही गांधीजींशी चर्चा करून सर्व काहीं समजून घेतलें.

□□□

**आठवण क्र. ७ :**

## पंगत वाढतांना मुलांशीं खेळणें

साबरमती आश्रमांत कांहीं दिवस आश्रमांतील पंगत वाढण्याचें काम स्वतः गांधीजी करीत असत. कोणाला किती फुलके लागतात हें त्यांच्या स्मरणांत होतें. स्वयंपाकाच्या टेबलाजवळ ताट वाढून घेण्यास कोणी पुढें येतांच, त्याचें नांव, त्याला लागणाऱ्या फुलक्यांची संख्या गांधीजी सांगून फुलके व अन्य पदार्थ वाढीत असत. एखाद्यानें कमी फुलके मागितल्यास, 'आज दोन फुलके कमी कां?' असें ते विचारीत. म्हणजे नंतर पंक्तीमध्यें पुन्हां फारसें वाढावयास लागत नसे. परंतु कांहीं मुलें बापूजींना अधिकचा हेलपाटा पडावा यासाठीं गांधीजींच्या हातांत जो जिन्नस वाढावयास आणला गेला असेल तेवढाच पदार्थ नेमका सोडून अन्य पदार्थ मुद्दाम मागण्यास विसरत नसत. पानाकडे दृष्टिक्षेप करून कोणता पदार्थ पाहिजे असेल याचा बरोबर अंदाज करून तो

पदार्थ गांधीजी आपल्या एका हातांत तयार ठेवून दुसऱ्या हातानें मागितलेला जिन्नस हेलपाटा करावा न लागतां पटकन् वाढून मोकळे होत असत. पंक्तीमधें अशा गंमती चालत असत.

पंक्तीमध्यें मुलांच्या गप्पांमध्येंही एखादा शब्द गांधीजी बोलत असत. एका मुलानें दुसऱ्या मुलाला म्हटलें कीं, ' आपल्यास वाटतें ते स्पष्टपणें कोठेही कोणाही पुढें सांगण्यास हरकत नाहीं, त्यांत भिण्याचें कांहीं कारण नाहीं. ' मध्येंच रसिकभाईनें त्याला पुस्ती जोडली–' लेकिन विनयके साथ । ' हें ऐकताच पंगत वाढत असतानाच गांधीजी उद्गारले कीं–' रसिकभाईनें ठीक कहा है । ' अशाही गमती पंक्तीमधें रोज अनेक चालत असत. पंक्तीमधें मोठी माणसें क्वचितच कांहीं बोलत असत.

९७७८२

**आठवण क्र. ८ :**

## गांधीजी व संगीत

संगीताविषयीं गांधीजींच्या मनांत फार मोठा पक्षपात असे. संगीतामधें कितीतरी गुण आहेत असें त्यांचे मत होतें. खरा संगीतज्ञ अनुदार असणार नाहीं असें त्यांना वाटे. संगीत शिकण्याची सहज संधी जर कोणास मिळत असेल तर त्यानें ती फुकट दवडूं नये असें त्यांचे सांगणें असे. आश्रमामधें मुद्दाम महिना पाउणशें रुपये पगार व शिवाय त्यांच्या कुटुंबाची रहाण्याची वगैरे व्यवस्था करून देऊन पं. नारायणराव खरे यांची योजना संगीत शिक्षणासाठी केली होती. संगीत प्रत्येकानें शिकावें असें गांधीजींचें मत असल्यामुळें कितीतरी आश्रमवासी संगीत शिकावयास आले होते. कोण, कोणत्या बुद्धीनें संगीत शिकावयास लागले होतें हें कोणासहि कळणें शक्य नव्हतें. शारीरिक कष्टाच्या कामांतून तितकीच सुटका व आराम मिळेल या धोरणानेंच संगीताच्या वर्गांत नांव घालणारे–माझ्यासारखे–कांहीं लोक असतातच. विनोबाजीचे बंधू बाळकोबाही त्यावेळीं आमच्याबरोबर संगीत शिकत होते.

आश्रमांत अशा प्रकारें संगीत शिकणारे लोक बरेच झाल्यानंतर एक दिवस आश्रमांतील सर्व कामें बंद ठेवून एक जलसा भरविण्यांत आला. एका हॉलमध्यें एक मोठे व्यासपीठ मांडून दोन्हीं बाजूंना दोन तंबोरे वाजविणारे बसविण्यांत आले आणि प्रत्येकानें या दोन तंबोऱ्याच्या मध्यभागीं गवयासारखे बसून

आपल्याला येईल तें पद म्हणून दाखवायचें अशी योजना होती. या जलशाला गांधीजी हजर राहिले होते व पू० 'बां'नींही भाग घेतला होता. पण ज्यांना आवाजी किंवा संगीताचें ज्ञान नव्हतें अशांनीं देखील गवयांसारखे बसून गावून दाखविलें तेव्हां इतरांची भीति कमी होऊन त्यांना सभाधीटपणा आला. या जलशांत जे भाग घेऊं शकले नाहींत त्यांची नांवें संगीत वर्गातून कमी करण्यांत आली. या जलशाच्या अनुभवानंतर ज्या पांचसहा लोकांनीं संगीत शिकण्याचा जरूर प्रयत्न करावा असें मुद्दाम सांगण्यात आले होते त्यांत माझेंही नांव होतें.

□ □ □

**आठवण क्र. ९ :**

## बॅ. सावरकरांचीं जप्त पुस्तकें

आश्रमामध्यें बॅ. सावरकरांची जप्त पुस्तकें मी वाचीत असे ही गोष्ट गांधीजींना समजली. त्यांनीं मला म्हटले कीं, 'तीं पुस्तकें वाचण्यास मुळींच हरकत नाहीं. पण सरकारला तुम्ही आगाऊ कळविलें पाहिजे कीं मी ही जप्त पुस्तकें वाचीत आहे. याचे जे परिणाम होतील तेही भोगण्यास तयार झालें पाहिजे. बॅ. सावरकरांची जप्त पुस्तकें वाचून येवढाही धोका स्वीकारण्याला आपण तयार होऊं नये काय?' नाहींतर तीं पुस्तकें जेथून आणलीत तेथें परत पाठवा. तीं पुस्तकें माझी वाचून जवळ जवळ संपलींच होतीं. मी तीं परत ज्यांची त्यांच्याकडे पाठविली.

□ □ □

**आठवण क्र. १० :**

## गांधीजी व प्रार्थनेंतील साप

एक साप आश्रमामध्यें एकदां सायंकाळीं प्रार्थनेच्या वेळीं गांधीजींच्या अंगावर चढून दुसऱ्या बाजूनें खालीं उतरला. त्यावेळीं त्यांनीं कांहींही हालचाल केली नसली तरी त्यांच्या जीवाला भीति चाटून गेली. त्याचें प्रायश्चितही गांधीजींनी घेतलें होतें. तो साप बाजूला निघून गेल्यामुळें सर्वच आश्रमवासीयांची अब्रू वाचली. त्या सापानें आपला मोर्चा इतरांकडे वळविला असता तर काय दृश्य पहावयास मिळालें असतें हें आज सांगतां येणार नाहीं. मृत्युला मुळींच भीक न घालणारे कांहीं लोक आश्रमामधें होते. यांत शंका नाही.

□ □ □

आठवण क्र. ११ :

## गांधीजी, द्राक्षें आणि लहान मुलगा

दिल्लीमधें गांधीजी राहात असलेल्या हरिजन वाडींतील एक गोष्ट. त्यांना भेटण्यासाठीं एका हिंदी कुटुंबांतील आई व मुलगा आले होते. त्या दिवसांत भोजनोत्तर गांधीजी तेहतीस द्राक्षे खात असत. तो लहान मुलगा तें दृश्य पाहून हंसत होता. गांधीजींनी त्याला हंसण्याचें कारण परोपरीनें विचारलें. पण कांहीं केल्या तो तें सांगेना ! आणि त्याचे हंसेंहि थांबेना. मग गांधीजींनी एक पर्याय काढला व त्याला ते म्हणाले कीं, 'ठीक आहे. मला सांगू नकोस. तुझ्या आईच्या कानात सांग !' हें त्या मुलाला पटलें. त्यानें आपल्या हंसण्याचें खरें कारण आईच्या कानांत सांगितलें. गांधीजींनी नंतर त्याच्या आईकडे विचारणा केली कीं, 'हा का इतका हसतो आहे ? त्यानें काय कारण सांगितले ?' पण त्याची आई म्हणाली कीं, 'पोरबुद्धी आहे. त्याच्याकडे काय लक्ष द्यावयाचें ? तो कांहींतरी बोलतो. गांधीजींनी आग्रहच धरला कीं मला त्याचें हसण्याचें कारण ऐकायचें आहे. आईनें नाइलाज होऊन सांगितलें कीं तो म्हणतो, 'बुड्ढा पागल हुआ है।'

तेव्हां गांधीजी म्हणाले कीं, 'मला पुष्कळ लोक पागल म्हणतात त्याप्रमाणें तूंही म्हणतोस काय ?' त्या मुलाला आईनें कांहीं खाऊ दिल्यास तो जर त्यानें आपल्या लहान भावाला न देतां खाल्ला तर आई त्याला पागल म्हणत असे– 'लडका पागल हुआ है।' तेंच त्यानें गांधीजींना म्हटलें होतें. कारण त्याला एकहि द्राक्ष न देतां बापूजी एकटेंच द्राक्षें खात होते. तेव्हां गांधीजींनीं दोन द्राक्षें त्या मुलाला देऊं केली. तो मुलगा तीं घेईना. त्या आईनेंहि त्याला सांगितलें कीं, 'आपले बापूजी द्राक्षें देतात ती घे. तो प्रसाद आहे. नको म्हणू नये.'

पण मुलगा म्हणाला कीं, 'आतां येथें तीं द्राक्षें घेण्यास मला सांगशील पण घरीं गेल्यानंतर 'दुसऱ्याकडे गेल्यानंतर असें देतील ते घेऊन खातात काय ?' असें म्हणून मला मारशील तेव्हां ?' हें त्या मुलाचें बोलणें ऐकून सर्वच हंसले. परंतु तो मुलगा गांधीजींनीं दिलेली द्राक्षें घेईना. म्हणून गांधीजींनीं तीं द्राक्षें त्याच्या आईच्या हातांत दिलीं. व त्या मुलानें आपल्या आईच्या हातून द्राक्षें घेतली.

९२३१५

**आठवण क्र. १२ :**

## घरून पळून आलेला एक विद्यार्थी

मुंबईहून एक विद्यार्थी घरून कोणासहि न सांगतां साबरमती आश्रमांत आला होता. त्याला गांधीजींनीं विचारलें कीं तूं मुंबईहून येथपर्यंत कसा आलास? त्यानें मनमोकळेपणें सांगितले कीं मी माझ्या घरी चोरी केली व त्या पैशानें येथवर आलो. आश्रमाची सर्व शिस्त पाळून मी आश्रमांत राहूं इच्छितों. गांधींनीं त्याला सांगितलें कीं तूं मुंबईपर्यंत चालत जा. सर्व गोष्टी वडिलांच्या जवळ कबूल कर. आणि त्यांच्याकडून मला पत्र येईल असें कर. कांहीं काळ तूं आपल्या वडिलांकडे आज्ञाधारकपणें राहा. मग मी मुंबईमध्यें केव्हातरी तुझ्या वडिलांना भेटून तुझ्याविषयीं बोलेन. त्यांनी तुला साबरमती आश्रमांत पाठवल्यास मी तुला आश्रमांत ठेवून घेईन. आणि तुला त्यांनीं आश्रमांत जाण्यास माझ्या भेटीनंतरहि परवानगी न दिल्यास तुझ्या मनाचा निश्चय झालेला असला पाहिजे कीं वडील सांगतील त्याप्रमाणें आज्ञाधारकपणें राहून आपलें शिक्षण पुरें करावें लागेल. यांत तुला जगाचा मौल्यवान् अनुभव मिळेल व तूं आपल्या वडिलांनाहि जिंकूं शकशील. ही शक्ती तुझ्यामध्यें आली तरच आश्रमांत येऊन तुझा उपयोग होईल; नाहींतर तुझें आयुष्य व्यर्थ जाईल व तुला पश्चात्ताप करावा लागेल. तो विद्यार्थी साबरमतीहून मुंबईस पायीं जाण्यास निघाला. पुढें त्याला कोणतें व कशा प्रकारचें वळण लागलें तें समजलें नाहीं.

□ □ □

**आठवण क्र. १३ :**

## निपाणींतील सोसाट्याचा वारा व तंबाखूची भुकटी

गांधीजी कर्नाटकच्या दौऱ्यावर आले असतांना निपाणी गांवीं त्यांचा मुक्काम दोन दिवस होता. त्यांचा मुक्काम श्री. सिका यांच्या तंबाखूच्या कारखान्यामध्यें होता. कित्येक वर्षे त्या आवारामध्यें व इमारतीमध्यें तंबाखूचा सांठा व व्यवहार चालत आला होता. गांधीजींचा मुक्काम येथें होणार असल्यामुळें तेथील सर्व तंबाखूचा सांठा अन्यत्र हलविण्यांत आला होता. एके दिवशीं सकाळीं गांधीजी बहिर्दिशेला बसल्या वेळीं एकदम सोसाट्याचा भयंकर वारा सुटला आणि त्या आवारांतील तंबाखूची भुकटी आवारभर उडून

चोहोंकडे पसरली. पुस्तकें, चरखा, लोकांचे कपडे, अंथरुण, पांघरूणें, माणसांचे केस, डोकीं, भुवया, दाढी, मिशा सर्व कांहीं तंबाखूच्या वखगाळ भुकटीनें भरून गेले होते. लोक भुतासारखे दिसत होते. ' जन्मभर तंबाखूला स्पर्शहि न केल्याचें उट्टें निघालें. ' असें उद्‌गार गांधीजींच्या मुखांतून निघाले. पण गांधीजींनीं आपला मुक्काम तेथून हलवला नाहीं. व्हावयाचें तें होऊन गेलें. आतां मुक्काम हलविला काय किंवा न हलविला काय? दोन्ही सारखेच, असा त्यांनीं विचार केला. महिनाभर आधीं त्या आवारांतील तंबाखू हलविल्यावरहि इतकी वखगाळ तंबाखूची भुकटी तेथें राहिली असेल अशी कोणास कल्पनाहि नव्हती. सोसाट्याचा वारा आला नसता तर कोणास समजलें देखील नसतें कीं आपला मुक्काम तंबाखूच्या वखारीमध्यें आहे. पण त्या वावटळामुळें सर्वच पितळ उघडें झाले. मुद्दाम आग्रह करून, हट्ट करून श्री. सिक्का यांनीं आपल्या वखारीमध्यें गांधीजींचा मुक्काम करविला होता. गांधीजी त्याचवेळीं दिगंबर होऊन बहिर्दिशेला बसले असल्यामुळें तंबाखूच्या भुकटीनें त्यांचें स्वरूप भयंकर दिसत होतें. गांधीजींच्या चरख्याच्या आंतील भागांतहि तंबाखूची भुकटी प्रवेश करूं शकली होती.

□ □ □

**आठवण क्र. १४ :**

## You are the slave of the machine

निपाणींतील याच दौऱ्यामध्यें गांधीजी एकाएकी आजारी झाले. सर्वांच्या काळजीचा तो एक विषय होऊन बसला. श्री. गंगाधरराव देशपांडे स्वतः मिरजेस जाऊन डॉ. वॉनलेसला तावडतोब घेऊन आले. अमेरिकेहून शिकून आलेले तीन-चार डॉक्टर्स निपाणीस जमले होते. डॉ. अंकलीकर विजापूर, आणि डॉ. कोकटनूर आपापलीं ब्लडप्रेशर पाहण्याचीं यंत्रें घेऊन उपस्थित होते. म. गांधींचें ब्लडप्रेशर तपासावयाचें आहे ही गोष्ट ध्यानांत घेऊन डॉ. वॉनलेस तर आपल्या नव्या कोऱ्या यंत्रासह निपाणींत हजर होते. त्यांनीं आपल्या यंत्रानें गांधीजींचें ब्लडप्रेशर पाहिलें. ब्लडप्रेशर फारच वाढलेलें होतें. गांधीजी रोज अर्धा तास सूत कातल्याशिवाय राहात नसत. ती त्यांची प्रतिज्ञाच होती. ' यावेळीं अर्धा तास सूत कातले तर आपल्याला खात्रीनें अर्धांगवायूचा झटका आल्याशिवाय राहणार नाहीं, असा स्पष्ट शब्दांत डॉ. वॉनलेसनें

इशारा दिला होता. गांधीजी म्हणत होते कीं, 'सूत कातता कातता मृत्यु आल्यास, त्यापेक्षां दुसरें कोणतें अहोभाग्य आहे?' सूत कातण्यापासून गांधीजींना परावृत्त करण्याची शक्ति कोणामध्येंच नव्हती. श्रीमान् महादेवभाई देसाई तर अश्रुपूर्ण नयनांनीं केवळ पाहात उभे होते. गांधीजी म्हणत होते कीं, 'माझी प्रकृति मला चांगली माहीत आहे व समजते. आपल्या ब्लडप्रेशर पाहण्याच्या यंत्रानें माझें जें ब्लडप्रेशर दाखवलें आहे तितकें अधिक ब्लडप्रेशर माझें आतां असावें असें मला वाटत नाहीं. म्हणून डॉ. अंकलीकर यांनी आपल्या मशीननें गांधींचें ब्लडप्रेशर तपासलें, तें अगदींच नॉर्मल आलें. त्यावेळीं गांधीजींनीं डॉ. वॉनलेसला सहज हंसत हंसत सांगितलें कीं, You are the slave of the machine. You are no doctor! गांधीजींनीं सर्वांसमक्ष अर्धा तास सूत कातलें व त्यांना कांहींहि झालें नाहीं. अर्धा तास सूत कातण्याचा व त्याप्रमाणें अमूक इतके 'तार' कातण्याचा त्यांचा नियम होता. कातलेल्या सूताचे धागे मोजण्यास मला सांगण्यांत आलें. मी धागे मोजले. त्या ठराविक धाग्यांच्या संख्येपेक्षां चार धागे कमी पडल्याचें मी सांगितले. गांधीजींनीं आपला बंद करून ठेवलेला चरखा पुन्हां उघडला व पांचसात धागे पुन्हां सूत कातून धाग्यांची ठराविक संख्या पूर्ण केली. मी चार धागे कमी आहेत असें सांगून गांधीजींना त्या परिस्थितींत त्रास दिला म्हणून माझ्याकडे डोळे वटारून पाहणारे लोक तेथें कमी नव्हते.

□□□

आठवण क्र. १५

## अंबोली मुक्कामांतील धोती-पोती आणि शीर्षासन

निपाणीहून गांधीजी अंबोली घाटांतील सावंतवाडीकरांच्या हिलस्टेशनवरील बंगल्यावर हवेसाठी व प्रकृतिस्वास्थ्यासाठीं येऊन एक महिनाभर राहिले होते. गांधीजींनीं कोठेंतरी वाचलें होतें कीं शीर्षासनानें ब्लडप्रेशर कमी होतें. पण डॉक्टर लोक त्यांना शीर्षासन करण्यांस परवानगी देईनात. गांधीजींना वाटत होतें कीं पूर्वीचे तज्ञ वैद्य अनुभवावांचून भलतेंच अंदाजानें कांहींहि लिहून ठेवणार नाहींत. यावर माझी श्रद्धा आहे. शेवटीं सर्वांच्या विचारें कुवलयानंद स्वामींना अंबोलीस बोलावून घ्यावें व त्यांच्या विचारें, त्यांच्याच देखरेखी-

खालीं गांधीजींनीं शीर्षासन करावें असें ठरलें. कुवलयानंदांकडून तारेनें उत्तर आलें कीं, Wait till I reach.

कुवलयानंदांनीं गांधीजींची प्रकृति वगैरे तपासून व डॉक्टरांशीं विचार विनिमय करून गांधीजींकडून शीर्षासन करवून घेतलें व त्यापासून गांधीजींची प्रकृति सुधारण्यास मदतच झाली.

त्याचप्रमाणें धोती-पोती करण्याकडे गांधीजींची प्रवृत्ति वाढूं लागली. अंबोलीमध्यें गांधीजींच्या कॅम्पमध्यें रहाणाऱ्या सर्वांकडून धोती-पोती करवून घेण्याचा गांधीजींनीं आग्रह धरला. त्यांची पत्नी ' कस्तुरबा ' कडूनहि त्यांनीं तें करविलें. ' बा ' नकट्या होत्या त्यामुळें त्यांना त्याचा त्रास झाला व त्या आजारी पडल्या. उंच नाक असणाऱ्या लोकांना ती क्रिया त्या मानानें सोपीं गेली. एका नारळाच्या शेंडीच्या धाग्याला कापडाची एक बारीकशी चिंधी गुंडाळून तो धागा नाकांतून सरकवीत सरकवीत घशातून बाहेर काढावयाचा असतो. त्यामुळें नाकाचें वरचें तोंड व घसा यामधील मागचा भाग स्वच्छ होतो. कारण तो कधींच धुतला जात नसतो. ' पोती 'च्या चिंध्या उकळून रोज स्वच्छ करण्याचें काम माझ्याकडे होते. म्हणून मला ' पोती मास्तर ' म्हणत असत. त्या कँपमध्यें बेळगांवचे श्री. जीवनरावही होते. ते या प्रयोगांत सांपडले नव्हते. पण राजाजी मात्र सांपडले होते व त्यांना तें फारसें कठीण गेले नाहीं. कारण त्यांचें नाक बरेंच उंच आहे. धोती मात्र गांधीजीवाचून कोणी केली नाहीं व त्याचा आग्रहहि गांधीजींनीं धरला नव्हता. एक महिना-भर हा कार्यक्रम चालू होता. गांधीजी तेथूनच ' नंदिहिल्सवर ' हवेसाठीं आणि प्रकृतिस्वास्थ्यासाठीं राहावयास गेले.

¤¤¤

आठवण क्र. १६

## कार्यकर्त्यांच्या भावनांची जपणूक

आपल्या संबंधांत येणाऱ्या कार्यकर्त्यांच्या मानापमानाची व भावनांची जपणूक गांधीजी मनापासून काळजीपूर्वक करीत असत. ते दिवसा रोज सकाळीं बेदाण्याची ठराविक संख्या शिजवून खात असत. बाजारांतून कांहीं बेदाणे आणवून ते एका भांड्यांत शिजवून मी गांधीजींना दिले. मी बेदाणे मोजून घातलेले नहते. गांधीजी आपल्याला पाहिजे तेवढे बेदाणे खातील व

बाकीचे उरतील. त्यांना कमी पडले नाहींत म्हणजे झाले. असा विचार मी केला होता. शिजविलेल्या बेदाण्याचें भांडें आणून मी सकाळीं त्यांच्यापुढें ठेवलें यांतील त्यांना पाहिजे तेवढे ठराविक बेदाणे त्यांनीं खाल्ले व तें भांडें तसेंच आपल्याजवळ ठेवून घेतले. त्यांच्या खोलींतील तें भांडें घेऊन जाण्याचा मी दोन चार वेळा प्रयत्न केला पण प्रत्येक वेळीं, ' तें तेथेंच असू दे ' असें मला त्यांनीं सांगितलें. मला त्याचा अर्थ कळला नाहीं, खोलींत सकाळीं आणून ठेवलेलें भांडें तेथेंच पडलें आहे तें परत घेऊन जाण्याकडे कोणाचें लक्षच नाहीं, असें त्यांच्याकडून म्हणवून घेऊं नये अशा विचारानें तें भांडें परत घेऊन जाण्याचा प्रयत्न मी करीत होतो. रात्रीं झोपण्याच्या वेळीं मला त्यांनीं बोलावून घेतलें व मी एकटां असतांना मला त्यांनीं चार शब्द ऐकविलें त्यासाठीं मी एकटांच असतांना त्यांना माझ्याशीं बोलायचें होतें. ते म्हणाले—

' मी रोज सकाळीं २५ बेदाणे शिजवून खातो व त्यातील अर्क किंवा सत्त्व उकळत्या पाण्यांत जात असल्यामुळें तें पाणी पीत असतो. त्यासाठीं ते बेदाणे धुवून, पुसून, काड्या व घाण काढून टाकून मगच ते शिजवायचें असतात. आज तूं तें कांहींच केलेलें नव्हतेस. प्रत्येक बेदाणा मी स्वतःच त्या पाण्यांत धुऊन घेऊन खाल्ला. बेदाण्यांतील घाण, धुरळा आणि काड्या त्या पाण्यांत असल्यामुळें मी तें पाणी आज पिऊं शकलों नाहीं. म्हणजे तितकीं पोषक द्रव्यें आज माझ्या पोटांत कमी गेलीं. ही गोष्ट तुझ्या नजरेस आणण्यासाठींच मी तें भांडें आतांपर्यंत येथें माझ्याजवळच ठेवून घेतलें होतें.'

मी सर्व कांहीं समजलों व त्यापासून धडा घेतला. तें सर्व मला ऐकविण्यास माझी एकट्याची भेट होईपर्यंत गांधीजींनी वाट पाहिली, हाच त्यांचा मोठें-पणा व हीच त्यांची सूक्ष्म अहिंसा. ही गोष्ट ैा. गंगाधरराव देशपांडे व त्यांची मातोश्री यांना फक्त मी सांगितली होती.

□ □ □

**आठवण क्र. १७ :**

## लवंगांची भुकटी व गांधीजी

कांहीं दिवस गांधीजी लवंगांची पूड रोज दिवसांतून दोन वेळां खात असत. शेळीच्या तुपामध्यें लवंगा परतून व भाजून त्यांची पूड एका डबीमध्यें घालून आपल्याबरोबर ते ठेवीत असत. हें मला माहित असल्यानें गंगाधर-

१०८६२

रावांच्या मातोश्रीकडून मी ती पूड आगाऊच करवून ठेवण्याची काळजी घेतली होती. ती पूड तयार ठेवलेली पाहून गांधीजींना आश्चर्य व कौतुक वाटलें. अशी लवंगांची पूड तयार करून ठेवण्यास गांधीजींनी मला नंदिहिल्सला जातांना सांगताच मी त्यांच्या हातांत ती पूडच दिली व त्यांनीं दाखविलेल्या डबीमध्यें घालून ठेवली. मला हें माहीत असल्यामुळें, मी आगाऊ ती तयार करून ठेवली होती असें सांगतांच त्यांना आनंद झाला व कौतुक वाटलें. पण पुढें कांहीं वर्षांनंतर असेंच बोलण्यावरून बोलणें निघालें असतां गंगाधररावांच्या मातोश्रींनीं मला सहज सांगितले कीं, 'केवळ आठ तास आधीं ही गोष्ट मला कळविण्यांत आली होती. मला कोठेंहि त्यावेळीं शेळीच्या दुधाचें तूप मिळालें नाहीं. मी त्याचा फारसा बोभाटा न करतां, गाईच्या तुपांतच लवंगा परतून, भाजून त्याची वस्त्रगाळ पूड तयार ठेवली व ती तूं मागतांच तुझ्या हातांत दिली. त्याविषयीं मी आजपर्यंत कोठेंहि, कोणाजवळहि चकार शब्द उच्चारलेला नाहीं.' हें ऐकतांच मी थंडच पडलों. परंतु या घटनेस कांहीं वर्षे होऊन गेली असल्यामुळें, ती सुधारणें किंवा त्याविषयीं कांहीं करणें शक्यच राहिलेलें नव्हतें. त्या गोष्टीवर कायमचा पडदा टाकला गेला.

ग्रंथालय ... अनुक्रम ... ७७३७० ... परिग्र ... दि ... ७२३

**आठवण क्र. १८ :**

## ते मला सोमवारींच प्रश्न विचारीत असतात.

आश्रमांतील लोकांना सायंकाळच्या प्रार्थनेनंतर कांहीं प्रश्न गांधीजींना विचारण्यास संधी मिळत असे. मी त्यांना केव्हां केव्हां, नव्हे अनेक वेळां प्रश्न विचारीत असे. प्रार्थना झाल्यानंतर गांधीजींच्या मनांत कांहीं सांगावयाचें असल्यास सांगत असत. पण कांहीं सांगावयाचें नसल्यास ते 'जाओ' असें म्हणत असत. त्यानंतर प्रार्थना विसर्जन झाली, असें समजावयाचें असे. कांहीं महत्त्वाचे प्रश्न मला विचारावयाचें असल्यास मी त्यांना सोमवारीं सकाळीं लेखी विचारीत असे. सोमवारीं गांधीजींचें मौन असे. त्यामुळें त्यांना लेखी उत्तर द्यावें लागत असे. मी एका कागदाच्या अर्ध्या भागावर माझे प्रश्न लिहून उत्तरासाठीं कागदाचा अर्धा भाग कोरा ठेवीत असे. माझा तसला कागद पाहतांच 'याला माझीं लेखीं उत्तरें पाहिजे आहेत' अशा अर्थाने ते माझ्याकडे पाहून हंसत असत.

कोणास कांहीं प्रश्न विचारावयाचे असल्यास विचारावेत अशी सूट मिळतांच कांहीं लोक माझ्याकडे पाहूं लागत. ' यांचे कांहीं प्रश्न असावयाचेच ' हा त्यांतील अर्थ, हें पाहून गांधीजी म्हणत असत. ' पुंडरीक तो सोमवार के दिन मुझे प्रश्न पूछेगा ! ' यामध्यें जें प्रेम व आपुलकी होती, तिच्या स्मरणानें आजाहि मला आनंद होतो. माझ्या प्रश्नांचीं लेखीं उत्तरें गांधीजींकडून मिळविलीं होतीं, ते सर्व कागद मी जपून ठेवले होते. ते सर्व मी डॉ. तेंडोलकर गांधी चरित्राचे लेखक, यांचेकडे दिले आणि त्यांनीं त्यांचा उपयोग केला व कांहींचे तर ब्लॉक्स करवून ते त्यांनीं आपल्या ग्रंथामध्यें दिलेले आहेत. मला गांधीजींकडून आलेलीं पत्रें वगैरे सर्व कागद मी गांधी स्मारक समितीकडें पाठवून दिलेले आहेत.

□ □ □

**आठवण क्र. १९**

## मालवीयजी असें न सांगतील तर दुसरें कोण सांगेल ?

फैजपूर कॉंग्रेस अधिवेशनाच्या वेळचा प्रसंग-- गांधीजींच्या निवासस्थानावर माझी नेमणूक झाली होती. निवासस्थानाचें बाहेरचें आवार म्हणजे विस्तीर्ण मैदानच होतें, आणि त्या आवाराच्या शेवटीं फाटक होतें. गांधीजींच्या दर्शनासाठीं बाहेर लोकांच्या झुंडीच्या झुंडी जमल्या होत्या. फाटकाचें कुलूप काढून फाटक उघडण्यास लोक मला विनवीत होते आणि फाटक न उघडल्याबद्दल मला शापीतहि होते. लोकांच्या निवडक नेत्यांच्या निवासस्थानावरील ही कामगिरी अत्यंत कठीण व तापदायक असते, ' एवढें फाटक उघडण्यास या माणसाचें काय खर्च होत असेल ? ' ' याला माणुसकीच नाहीं. ' ' अहो तुम्हांला कान आहेत कां ? ' असें वाक्प्रहार बाहेरील लोक करीत होते ते ऐकून घेत बसावे लागले.

इतक्यांत पं. मालवीयजी, गांधीजींच्या भेटीस आले. आतां फाटक उघडल्याशिवाय गत्यंतरच नव्हतें. फाटक मी उघडीत असतांना मालवीयजींनीं तेथें जमलेल्या लोकांना सांगितलें कीं ते माझ्यासाठीं फाटक उघडीत आहेत. त्याचा फायदा घेऊन कोणीहि आंत घुसतां कामा नये. आपल्याला गांधीजींचें दर्शन जवळून मिळेल याची व्यवस्था मी करून देईन. मी थोड्याच वेळांत परत जाणार आहे. ' त्याप्रमाणें मालवीयजींसाठीं मी फाटक उघडल्यावर

कोणीहि फाटकांतून आंत घुसण्याचा प्रयत्न केला नाहीं. मालवियजी थोड वेळ गांधीजींशी बोलणें करून परत जाण्यास निघाले. त्यांच्यासाठीं मी पुन्हां फाटक उघडून वाट करून दिली व नंतर फाटकाला कुलूप घातलें. जातांना मालवीयजींनीं त्या सर्व लोकांच्या देखत मला सांगितलें कीं, 'हें फाटक उघडून या सर्व लोकांना या आवारांत व्यवस्थित बसवा. हे सर्व लोक बसतील. गोंगाट वगैरे करणार नाहींत. गांधीजी बाहेर येऊन या लोकांमधून फिरतील आणि ते परत गेल्यानंतर हे लोक शिस्तीनें बाहेर जातील. त्यानंतर तुम्हीं फाटक बंद करा.' असें सांगून मालवीयजी निघून गेले. 'मी लागलीच परत येतो.' असें लोकांना सांगून मी तेथून निघून गेलों.

झालेली सर्व हकीकत मी गांधीजींना निवेदन केली. माझ्या निवेदनामध्यें मालवीयजींविरूद्ध तक्रारीचा सूर होता. गांधीजींनीं सर्व ऐकून घेतलें व म्हणाले कीं, 'मालवीयजी असें न सांगतील तर दुसरें कोण सांगूं शकेल? त्यांनीं सांगितल्याप्रमाणें फाटक उघडून सर्व व्यवस्था करा व मला कळवा. लोकांमधून हिंडण्यासाठीं मी बाहेर येतो.' मी पुन्हां बाहेर येऊन फाटक उघडलें. सर्व लोक शांतपणें आंत येऊन अनेक रांगांनी बसले. गांधीजींना फिरण्यास मधून मधून जागा ठेवण्यांत आली होती. गांधीजी बाहेर आले, त्यांच्यासाठींच राखलेल्या मोकळ्या जागेवरून ते फिरले आणि नंतर परत आपल्या खोलीमध्यें गेले. त्यानंतर सर्व लोक एखाद्या सैन्याच्या शिस्तीप्रमाणें निघून गेले आणि मी पुन्हां फाटक बंद करून बंगल्यामध्यें गेलों.

□ □ □

**आठवण क्र. २०**

## गांधीजीको बाहर बिठानेवाला पट्टेवाला

फार जुनी गोष्ट. आफ्रिकेहून गांधीजी परत भारतांत आले होते. त्यांचें कार्य बिहारमध्यें प्रथम सुरू झालें. त्या वेळच्या एका सरकारी अधिकाऱ्याची भेट गांधीजींनीं मागितली होती. त्यांना भेटीची वेळ देण्यांत आली होती. त्या दिवसांत गांधीजी गुजराथी पोषाख करीत असत. डोक्यावर गुजराथी रुमाल, अंगांत बाराबंदी, धोतर व पायांत गुजराथी चढाव हा त्यांचा पोषाख असे.

त्या सरकारी अधिकाऱ्याचा पट्टेवाला वृद्ध झालेला होता, आपल्या जागीं दुसऱ्या एखाद्याला ही पट्टेवाल्याची जागा मिळणार व आपल्या घराण्याचें हें

'पट्टेवाल्याच्या जागेचें' सौभाग्य नाहींसं होणार याची चिंता त्या वृद्ध पट्टेवाल्याला पीडा देत होती. त्याचा मुलगा त्यावेळीं १४–१५ वर्षे वयाचा होता. त्याचें वय वाढवून म्हणजे १९ वर्षें असल्याची बतावणी करून आपल्या जागीं मुलाची नेमणूक त्यानें मोठ्या वशिल्यानें करविली होती आणि तोच मुलगा गांधीजी अधिकाऱ्याच्या भेटीस आल्यावेळीं त्या अधिकाऱ्याचा पट्टेवाला म्हणून काम करीत होता.

ठरलेल्या वेळीं गांधीजी अधिकाऱ्याच्या भेटीसाठीं त्यांच्या ऑफिसमध्यें उपस्थित झाले. गांधीजींचा पोषाख व मूर्ति पाहून त्या पट्टेवाल्याला वाटलें हा कोणीतरी खेडवळ मनुष्य आहे. त्याला त्यानें बाहेरच एका बाजूला बसण्यास सांगितलें व म्हटलें कीं, 'आतांच साहेबाच्या भेटीसाठीं कुणी बडा माणूस येणार आहे, तो येऊन गेल्यानंतर तुझी वर्दी देतो. तोंपर्यंत तेथें बैस. वाटेंत इकडे तिकडे हिंडूं फिरूं नकोस.' पट्टेवाल्यानें दाखविलेल्या जागेवर गांधीजी बसून राहिले. अधिकाऱ्यानें बराच वेळ गांधीजींची वाट पाहिली आणि गांधीजींची वेळ टळून एक तास झाला. आतां ते आज येणार नाहींत असें मानून तो अधिकारी ऑफिसमधून बाहेर जाण्यास निघाला. हें पाहतांच पट्टेवाल्यानें विचारलें कीं एक माणूस आपल्या भेटीसाठीं आला आहे. एक तास झाला. त्याला बोलावूं काय? साहेबाची परवानगी मिळतांच पट्टेवाल्यानें गांधीजींना सांगितलें कीं आज साहेबाच्या भेटीसाठीं येणार होता तो माणूस आलाच नाहीं. साहेब बाहेर निघाले आहेत. चल बाबा लवकर, साहेबाला भेटून घे. माझ्या मागें मागें ये!' गांधीजी त्याच्या मागें मागें साहेबाच्या ऑफिसांत गेले. अधिकाऱ्यानें पाहिलें तो ते गांधीजी! गांधीजींनीं प्रारंभीच सांगून टाकले कीं मी अगदीं वेळेवर येथें आलो होतो. पण आपल्याकडे कोणी भेटीस येणार होते म्हणून मला बाहेरच बसविण्यांत आलें. पुढें कोणाला काय वाटलें असेल याची कल्पना करणें मी वाचकांवरच सोंपवितो. तो पट्टेवाला बराच म्हातारा होऊन कांहीं वर्षांपूर्वीं वारला. गांधीजींना ऑफिसाबाहेर तिष्ठत ठेवणारा पट्टेवाला म्हणून त्याला पाहावयासहि लोक जात असत.

□ □ □

आठवण क्र. २१

## हुदलींतील टेकडीवरील मंदिर

सन १९३७ सालीं गांधी-सेवासंघाचें संमेलन हुदली (जि. बेळगांव) नांवाच्या खेड्यांत झालें. पं. जवाहरलालजीशिवाय बहुतेक सर्व अखिल भारतीय पुढारी या संमेलनासाठीं हुदलीस आले होते. या हुदली गांवाला लागूनच एक टेकडी आहे. या टेकडीवर एक लहानसें मंदिर आहे. या टेकडीच्या पायथ्यालाच संमेलनाची छावणी उभारण्यांत आली होती. गांधीजी स्टेशनवरून चालतच आपल्या निवासस्थानीं आले. आपली मामुली कामें आटोपून ते संमेलनाच्या छावणीचें स्वरूप, मांडणी व व्यवस्था पाहण्यास निघाले. मला गांधीजींची माहिती असल्यामुळें मी त्यांच्याबरोबर सतत सावली-प्रमाणें राहात असे. आपल्या झोंपडींतून बाहेर पडतांच त्यांनीं मला विचारलें कीं, 'या टेकडीवरील मंदिर कोणत्या देवीचें?' मला माहीत नव्हतें, कीं मी त्याची कधीं चौकशीच केली नव्हती, किंवा त्या टेंकडीवर जाण्याचा मी कधीं विचारहि मनांत आणलेला नव्हता. ही वस्तुस्थिति, आहे तशी प्रांजळ-पणें त्यांना निवेदन करावी असें मला वाटलें व मी त्यांना म्हटलें कीं, 'मला तें माहित नाहीं, चौकशी करून सांगतो.' गांधीजी माझ्याकडे बघतच उभे राहिले व मला त्यांनीं विचारले कीं, 'तुम्हीं या गांवांत किती वर्षें ग्रामसेवा करीत आहात?'

'मी-या भागांत मी सुमारें ११ वर्षें काम करीत आहे.' गांधीजींनीं हात जोडले व ते क्षणभर उभे राहिले. मला ते कांहींच बोलले नाहींत. वास्तविक आतां बोलावयाचें काय राहिलें होतें? कांहीं वेळ गेल्यानंतर मी त्यांना म्हटलें कीं, 'मी चौकशी केली या टेकडीवर निर्वाणेश्वराचें मंदिर आहे.' ते म्हणाले मला समजलें. आतांच कोणीतरी मला सांगितलें. पुढें तें स्वतः ती सबंध टेकडी चढून तें मंदिर पाहूनहि आले.

□□□

आठवण क्र. २२

## गंगाधररावांना सुचलेलें उत्तरहि तुला देतां आलें नाहीं

हुदलीच्या गांधी सेवा संमेलनातील गोष्ट. हें संमेलन एक आठवडाभर चालत असें. या संमेलनाचे पहिले दोन दिवस झाल्यानंतर भयंकर पाऊस

झाला. सर्व भाग जलमय झाला. पाऊस, वारा यांनीं छावणींतील सर्व झोंपड्या जमिनीवर पाण्यांत अक्षरशः झोपल्या. सर्व लोकांना गांवामध्यें घरोघर पाठविण्यांत आले. पण जुनीं व मातीचीं माळवदें असलेलीं घरें—गंगाधररावांच्या पूर्व सूचनेप्रमाणें— वगळण्यांत आलीं होतीं. गांधीजी मात्र आपल्या झोंपडीमध्यें पावसांत रात्रभर उभे होते. संमेलनाच्या सभासदांना कुमरी आश्रमांत पाठवावें व इतर सर्व लोकांना आपआपल्या गांवीं जाण्यास सांगावें; हा निर्णय गंगाधरराव देशपांडे यांनीं रात्रीं ११ वाजतां, पावसाचा रागरंग व जोर पाहून घेतला. ही गोष्ट रात्रीं १॥ वाजतां गांधीजींना समजली. त्या रात्रीं पावसांतच घोड्यावर बसून संमेलनाच्या झोंपडी झोंपडींतून गंगाधरराव फिरत होते. गांधीजींनीं मला विचारलें कीं कुमरी आश्रमांत किती इमारती आहेत? संमेलनाचें सर्व सभासद राहूं शकतील एवढी जागा आहे काय?

मी—आश्रमांत चार घरें आहेत. मोठे सोपे असलेली एक इमारत आहे. त्यांत चार सोपे आहेत.

गांधीजी— त्या मोठ्या इमारतींतील एकेक सोपा किती लांब व किती रुंद आहे?

मी— मला माहीत नाहीं.

गांधीजी— हा आश्रम तुम्हीं किती वर्षें चालवीत आहांत?

मी— आज सात वर्षें पुरीं झालीं, असें आमचें बोलणें चाललें होतें, इतक्यांत गंगाधरराव घोड्यावर बसून तेथें आले. त्यांनाहि गांधीजींनीं विचारलें कीं, आश्रमांतील मोठ्या इमारतींतील एक एक सोपा किती लांब व किती रुंद आहे? गंगाधररावांनीं झटकन् उत्तर दिलें कीं, 'एकेक सोपा ६० फूट लांब व ३० फूट रुंद आहे.' असें म्हणून त्यांनीं घोडा फिरविला व ते जाऊं लागले. मीहि त्यांच्याबरोबर थोडें चालत जाऊन त्यांना म्हटलें कीं, 'तुम्हीं हें काय उत्तर दिलेंत? येवढे मोठे सोपे आश्रमांत आहेत कोठें?' तेव्हां गंगाधरराव म्हणाले की, 'गांधीजी काय टेप घेऊन मोजावयास गेले किंवा जाणार आहेत काय? शिवाय सोप्याची लांबी रुंदी मला माहीत नाहीं हें गांधीजींना माझ्या उत्तरानेंच समजलें आहे.' मी थोड्या वेळानें पुन्हां गांधीजींकडे झोपडीमध्यें आलो तेव्हां गांधीजींनीं मला हंसत हंसत म्हटलें कीं, 'आश्रमांतील सोप्यांची लांबी रुंदी आपल्याला माहित नाहीं, हें स्पष्ट सांगण्याची गंगाधररावांची युक्ति तुम्हांला सुचली नाहीं. त्याला जो मसाला लागतो तो तुमच्याकडे नाहीं.'

□ □ □

**आठवण क्र. २३**

### आश्रमाच्या कुलुपांच्या किल्ल्या मिळाल्या काय ? पाहा ना !

इंदलीच्या गांधीसेवा संघाच्या संम्मेलनाच्या वेळीं मुसळधार पाऊस पांच दिवस पडला. संघाच्या सभासदांना फक्त आश्रमांत नेण्यांत आले. बाकीच्यांना आपापल्या गांवीं जाण्यास सांगून पाठविण्यात आले. पाऊस जोरांत सुरूं होताच. गांधीजींचें सर्व सामान, पुस्तकें, कागदपत्रें वगैरे एका ताडपत्रीमध्यें गुंडाळून सुरक्षितपणें आश्रमामध्यें पोहोंचविण्यांत आले. कांहीं लोक पाठवून आश्रमाच्या सर्व इमारती व न्हाणीघर वगैरे साफ करवून गांधीजींच्या आश्रमामधें त्यांची बसण्याची खोली असे तशा सर्व वस्तू लावून ठेवण्याची व्यवस्था मी केली होती. गांधीजींना स्नानास अगदीं गरम पाणी लागतें हें मला माहीत असल्यामुळें पहाटें तेंहि तापवून ठेवण्यांत आलें होतें. पण ही गोष्ट गांधीजींना सांगितलेली नव्हती. पहाटेंची प्रार्थना झाल्यानंतर मी व गांधीजी आश्रमाकडे जाण्यास पायीं चालत निघालों. माझ्या एका हातांत छत्री व दुसऱ्या हातांत अर्धा डबा शेळीचे दूध आणि माझ्या खांद्यावर गांधीजींनीं आधारार्थ हात ठेवलेला अशा थाटांत आमची प्रभातफेरी निघाली. डोक्यावर सारखा सततधार पाऊस पडतच होता. पायाखालीं घोट्याइतकें पाणी वाहात होते. त्यामुळें गांधीजींचे पाय चपलांवरून वारंवार घसरत होते. माझ्या खांद्याला त्यांच्या हाताचा हिसका बसला म्हणजे मला तें समजत होतें. पण अशा बिकट परिस्थितींतही एक अमेरिकन बातमीदार गांधीजींचे फोटो घेण्याचा प्रयत्न करीत होता. त्या प्रसंगीचे फोटो अमेरिकेंतील वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाले होते. डॉ. तेंडोलकर यांनीं इंग्रजींत लिहिलेल्या गांधी चरित्र खंडामध्यें त्यांतील एक फोटो प्रसिद्धहि केला आहे. आश्रमाजवळ येईपर्यंत गांधीजी अगदीं थकून गेले होते. थोडे थांबून त्यांनीं मला विचारलें कीं, ‘ येथून आश्रमाच्या इमारती किती दूर आहेत ? त्या दिसतात त्या इमारती कोणाच्या ? ’

त्या इमारती दुसऱ्याच्या आहेत. येथून आश्रम, आतांपर्यंत आम्हीं आलो तितकाच दूर आहे. असें सांगून मी जमिनीकडे पाहात राहिलों. आणि गांधीजी पुढची वाटचाल करूं लागले. गांधीजी म्हणाले कीं, ‘ कडकडीत गरम पाण्याचें स्नान मला करतां आलें तर रात्रभरचें जागरण व रात्रभर पावसांत उभे राहणें मला बाधणार नाहीं. ’ मी त्यांना गंभीरपणें म्हटलें कीं, ‘ बापूजी, या भागांत या दिवसांत कधींच पाऊस पडत नसतो; हा असा पाऊस पडेल व सर्व सभा-

सदांना या आश्रमामध्यें आणावें लागेल याची आम्हांला कल्पनाहि नव्हती. एका महिन्यापूर्वी आम्ही आश्रमाला कुलूप लावून गांवांत गेलो. त्या कुलूपाच्या किल्ल्या गमावल्या आहेत. किल्ल्या हुडकण्याचें काम चालूं आहे. किल्ल्या मिळाल्यानंतर आश्रमांतील सर्व इमारती झाडून, मग पुढील व्यवस्था व्हावयाची आहे.'

बापूजी सर्व कांहीं शांतपणें ऐकून घेत पुढें चालले होते. बोलतां बोलतां आश्रमाच्या इमारती आल्या. त्यावेळीं माझ्या बोलण्यांतला कठोर विनोद गांधीजींच्या ध्यानांत आला असावा.

त्यांना न्हाणीघरांत जावयाचें होतें, त्यांनी मला विचारलें, 'न्हाणीघर मोकळें आहे कीं त्यालाहि कुलूप आहे? व त्याची किल्लीही किल्ल्यांच्या झुपक्यांत आहे?' 'न्हाणीला कुलूप नाहीं. न्हाणी उघडी आहे' असें सांगून मी त्यांना न्हाणीघर उघडून दिलें व दूर निघून गेलो. न्हाणीघरांत गांधीजींनीं काय पाहिलें? बंबांत पाणी उकळतें आहे. खालीं घंगाळांतही ऊन ऊन पाणी काढून ठेवलेलें आहे, विसणांसाठीं थंड पाणी वेगळ्या मोठ्या भांड्यांत भरून ठेवलें आहे. जवळच खुर्चीवर त्यांचेच नेहमीचे साबण, तेल, दांत घांसण्याचा ब्रश आणि दुसऱ्या खुर्चीवर त्यांचेच धूत कपडे त्यांना दिसून आले. गांधीजींनी मला बोलावून घेतले व मी त्यांच्याजवळ गेल्यानंतर माझ्या डोक्यावर एक चांगली चापटी मारली व म्हणाले कीं, 'आश्रमाच्या कुलूपांच्या किल्ल्या मिळाल्या काय पाहां ना!' न्हाणीघराचें दार व्यवस्थित बंद करून आपलें स्नान वगैरे आटोपून ते बाहेर आले. त्यांच्या बसण्याच्या ठिकाणीं, त्यांच्याच सर्व साहित्यानें अशी व्यवस्थित मांडणी केली होती कीं त्यांना आपण आपल्या आश्रमांतील खोलींतच बसलीं आहोंत असें वाटावें. पुढील तीन दिवसांचा संमेलनाचा कार्यक्रम त्याच आश्रमांत यथासांग पार पडला.

□□□

**आठवण क्र. २४**

## 'गांधीजी की नींद न तोडे'

कुमरी आश्रमाचा भाग चोहोंबाजूंनीं लहान मोठ्या टेकड्यांनी व्यापलेला असल्यामुळें कधीं कधीं त्या भागांत बिबटे, चित्ते येत असतात. रानांतील गुरेंहि त्यांनी मारून खाल्ल्याचीं उदाहरणें वारंवार होत असत. एखाद्या शिकाऱ्यानें

त्या चित्याला गोळीनें ठार केल्यानंतर पुन्हां कांहीं वर्षें त्यांचा त्रास होत नसे.

गांधीजी रात्री उघड्यावरच झोपत असत ही गोष्ट सर्वश्रुतच होती. गांधी. सेवा संघाचे सर्व सभासद आश्रमामध्यें आल्यानंतरची ही घटना आहे. एकें-दिवशी रात्रीं गांधीजी उघड्यावर झोपलेले असतांना एक बिबटा चित्ता या भागाला आला. मला प्रथम जाग आली. मी त्याचा आवाज अंदाजानें ओळ-खला. बाहेर सोप्यावर येऊन व न्याहाळून पाहिल्यानंतर त्या चित्याचे डोळेहि अंधारांतच चमकत असलेले मला दिसले. गांधीजी गाढ झोपेंत होते.

आंतील भागांत झोपलेले श्री. काकासाहेब कालेलकर यांना जागे करून मी विचारलें कीं, अशी अशी परिस्थिति आहे. गांधीजींना जागे करून आंत आणून झोपवू या काय?

काकासाहेब मला म्हणाले कीं, ‘ गांधीजींची झोपमोड करावयाची नाहीं. त्यांना जागे करूं नका. ज्या बाजूला तो चित्ता आहे असा संशय तुम्हांला आहे, त्या बाजूला हातांत एक टॉर्च घेऊन तुम्हीं स्वतः जाऊन उभे राहा. टॉर्चचा उजेड पाहून चित्ता पळून जाईल, तो इकडे येणार नाहीं.

काकासाहेब स्वतः गांधीजींपासून थोड्या अंतरावर स्वस्थ उभे राहिले. थोड्या वेळानें चित्याच्या गुरगुरण्याचा आवाज दूर दूर जात असल्याचें मला कळून आलें. गांधीजींची झोपमोड होऊं दिली नाहीं. ती रात्र व्यवस्थित पार पडली. टॉर्च हातात घेऊन पुढें जाऊन उभे रहातांना माझ्या मनाची काय स्थिति झाली असावी याची कल्पना करण्याचें काम वाचकांवरच सोप-वितों. दुसऱ्या दिवशीं सकाळीं गांधीजींना ही घटना समजली.

□ □ □

**आठवण क्र. २५**

## फैजपूर काँग्रेसची आठवण

फैजपूर काँग्रेस अधिवेशनाच्या वेळची गोष्ट. स्वयंसेवकप्रमुखस्थानीं कै. रावसाहेब पटवर्धन होते. मला गांधीजींची माहिती असल्यामुळें रावसाहेबांनीं माझी नेमणूक गांधी-कुटीरावर केली होती. त्याच वेळीं गांधीजी व मानवेंद्र रॉय यांची पहिली भेट झाली. त्यांच्या भेटीच्या वेळीं १५–२० प्रमुख नेत्यांना मुद्दाम निमंत्रणें पाठवून उपस्थित राहण्यास बोलाविलें होतें. मला त्यांत अर्थात् निमंत्रण नव्हतें. तथापि त्यांची ती महत्त्वाची चर्चा मला ऐकावयाची होती. माझी नेमणूक गांधी-कुटिरावर असल्यामुळें मला प्रवेश होताच.

हिंदुस्थानांत भूकंप कोठें व कां होतात याचा शोध लावण्यासाठीं कांहीं जर्मन इन्जिनियर्स भारतांत त्यावेळीं आले होते. त्यांतील प्रमुख इन्जिनियर गांधी-कुटीरामध्येंच राहात असत. म्हणून त्यांचा व माझा परिचय झाला होता.

ही रॉय–गांधीजी चर्चा ऐकावयाची असा मी निर्धार केला असला, तरी त्या खोलीमध्यें प्रत्यक्ष जाऊन बसण्याचें धैर्य, मी निमंत्रितांपैकी नसल्यामुळें, माझ्याकडून होईना. गांधी–कुटिरांतील भिंती म्हणजे मध्यें उभा बांधलेला एक तट्टया ! ज्या तट्टयाला लागून गांधीजी बसले होते, त्या दोन खोल्यांच्या मध्या-वर एका खुर्चीवर जर्मन इन्जिनियर बसले होते. त्यांनाहि त्या चर्चेस निमंत्रण नव्हतें.

तथापि त्या इन्जिनियरनें, गांधीजींना व इतरांना ऐकूं जाईल अशा मोठ्या आवाजांत, मला म्हटलें कीं, ' पुंडलीकजी, अशा प्रकारें आडून चर्चा ऐकणें योग्य नाहीं. तुम्ही हातांत वर्तमानपत्र घेऊन त्याकडे पाहात असला तरी तुम्ही ते वाचीत नाहीं हें कोणासहि समजण्यासारखें आहे. वाटल्यास आंत जाऊन बसा '

मला हा माझा अपमान वाटला व त्याचा मला भयंकर राग आला. पण करणार काय ? चर्चा चालू होती त्या खोलींत मी गेलो असतों आणि गांधी-जींनींच मला बाहेर जाण्यास सांगितलें असतें तर आणखी एक जाहीर अपमान होणार ! अशा पेचांत मी होतो. शेवटीं मी निर्णय घेतला कीं आपण आंत जाऊन बसावें, मग काय होईल ते होवो.

मी त्याप्रमाणें आंत गेलो व गांधीजींकडे पाहून डोळ्याच्या खुणेनेंच परवानगी विचारली व त्यांनींहि मला आंत बसून चर्चा ऐकण्यास डोळ्यांनींच परवानगी दिली. चर्चा दीड तास चालू होती. रॉय व गांधीजीच बोलत होते. इतर सर्व केवळ श्रवणभक्तीच करीत होते. या खाजगी सभेस कै. कृ. प्र. खाडिलकर उपस्थित होते. चर्चा आटोपून लोक परतत असतांना खाडिलकर म्हणाले कीं, सर्व ठीक आहे, But he (M. N. Roy) will not shine in India असें मला आठवते.

कोणाचाहि अपमान होऊ नये, कार्यकर्त्यांच्या भावनांची कदर करावी, एवढ्याच हेतूनें गांधीजींनी मला त्या चर्चेच्या वेळीं तेथें उपस्थित राहण्यास डोळ्याच्या खुणेनें परवानगी दिली होती यांत शंका नाहीं.

त्याच फैजपूर कॉंग्रेस अधिवेशनाच्या वेळीं एकदां पं. जवाहरलालजी गांधी कुटीरांमध्यें गांधीजींच्या भेटीस आले होते. ती वेळ गांधीजींच्या स्नानाची होती. स्नानाला आधींच थोडा विलंब झाला होता. गांधीजींच्या स्नानाचें पाणी काढून ठेवून, मी त्यांना बोलावण्यास घाईनेंच निघालों होतों. इतक्यांत मला दिसून आलें की, गांधीजी व जवाहरलालजी बोलत बसले आहेत. मला वाटले कीं यांचें काय संभाषण चालले आहे ते ऐकतां आल्यास पाहावें ! तेवढेंच दोन शब्द कानावर पडावेत ही अनाठायीं माझी कुतुहलता ! म्हणून मी माझा चालण्याचा वेग थोडा कमी केला.

पण ही गोष्ट गांधीजींच्या ध्यानांत आली आणि त्यांनीं मला डोळ्याच्या खुणेनें तसें न करण्यास सुचविलें.

आणि पुढें सवड मिळतांच मला ते म्हणाले कीं, 'तुझ्या ध्यानांत आलें ना? मला स्वतःच विचारशील तर जें सांगण्यासारखें तें मी तुला स्वतःच सांगीन.'

□ □ □

आठवण नं. २६

### पहाटेंची घंटा वाजविण्याचें काम आपल्याला दिलें आहे

गांधीजींच्या साबरमती सत्याग्रहाश्रमाचे व्यवस्थापक श्रीयुत मगनलालजी आश्रमांतील प्रत्येक कार्यक्रम वेळेवर झालाच पाहिजे, अशा आग्रहाचे होते. मी आश्रमांतील पहाटें ४–३० च्या प्रार्थनेला कधींच उपस्थित राहात नसे. साबरमती नदीकांठची भयंकर थंडी आणि माझा आळस या दोन कारणांमुळेंच मी पहाटेंची प्रार्थना टाळीत असे, म्हणून व्यवस्थापक श्री. मगनलालजी यांनीं मला गांधीजींच्यापुढे उभें केलें.

'तुम्ही पहाटेंच्या प्रार्थनेला का उपस्थित राहात नसतां?' गांधीजींनीं विचारलें.

'मी दिवसभर काम करून थकत असल्यामुळें, पहाटेच्या घंटेच्या आवाजानेंहि मला जाग येत नाहीं,' मी उत्तर दिलें.

'तर मग असें करा.' गांधीजींनीं उपाय सुचविला. 'ज्या ठिकाणीं पहाटेंची प्रार्थना होत असते, त्या ठिकाणींच आपण झोपा. आपल्याभोंवतीं बसून तरी सर्व लोक प्रार्थना करणार नाहींत? कांहीं दिवसानंतर पहाटेंस जाग येण्याची आपल्याला संवय लागेल.'

पण यालाहि माझें उत्तर तयारच होतें. मी म्हटलें, ' या आश्रमांत येण्यामध्यें मला पू. काकासाहेब कालेलकर यांचा सहवास लाभावा, असाहि माझा उद्देश आहे. म्हणून मी रात्रीं त्यांच्या बिऱ्हाडींच झोपत असतो. आणि तेथेंच पुढेंहि झोपणार आहे. '

या माझ्या उत्तराच्या पार्श्वभूमीला एक कारण होतें. पू. काकासाहेबांना त्यावेळीं टी. बी.ची व्याधी झालेली होती. त्यासाठीं पहाटें त्यांना जाग येऊं नये याची काळजी घेतली जात असे आणि मी त्यांच्याकडे झोपल्यास मला जागे करण्यास तेथें कोणीहि येणार नाहीं. ही माझी योजना ! !

गांधीजी कोणावरहि सहसा अविश्वास करीत नसत. ते मला म्हणाले, ' आपण म्हणतां तेंहि योग्यच आहे. काकांच्या सहवासाचे संस्कारहि उत्तमच होतील. ' इतक्यांत सायंकाळच्या प्रार्थनेची घंटा झाली. साहजिकच आमचें बोलणें तेथेंच थांबवावें लागलें. पण जातां जातां गांधीजी म्हणाले, ' आज प्रार्थना आटोपल्यावर मी फिरावयास जातो, त्यावेळीं माझ्याबरोबर आपणहि फिरावयास या. '

त्याप्रमाणें मी त्यांच्याबरोबर फिरावयास गेलों. त्यावेळीं त्यांनीं सांगितलें, ' रोज पहाटेची पहिली घंटा वाजविण्याचें काम उद्यांपासून आपल्याला दिलें आहे. '

मी त्यांना म्हटलें, ' घंटा वाजूनसुद्धां मला जाग येत नाहीं. मला पहाटेंची घंटी वाजविण्याचें काम दिल्यास आश्रमाचा सर्वच कार्यक्रम बिघडून जाईल. त्यापेक्षां हें काम मला न दिलेंच योग्य होईल. '

गांधीजी म्हणाले, ' त्याची काळजी आपण करण्याचें कारण नाहीं. ज्या दिवशीं आपल्याला जाग न आल्यामुळें घंटा वाजवूं शकणार नाहीं, त्या दिवशीं तें काम मी करीन. आणि मला तें काम करावें लागेल, त्या दिवशीं मी एकचवेळ भोजन करीन. आश्रमाची घंटा कांहीं झालें तरी वेळेवर वाजविली जाईलच. '

पहाटें ४–३० ची घंटा अगदी वेळेवर वाजविण्यासाठीं मी रात्रीं झोपेंतून दचकून दोन तीन वेळां जागा होत असे, गांधीजी ज्या खोलींत राहात असत, तेथून घंटेच्या जागेपर्यंत येण्यास सुमारें दीड मिनिट लागत असे. एकदां तर मला जाग येण्यास तीन चार मिनिटे वेळ लागला. जाग येतांच मी घंटेच्या स्थानाकडे पळत सुटलों. गांधीजी घंटा वाजविण्याचें दांडकें हातांत घेऊन घंटीवर मारणार इतक्यांत मी माझा हात मधेंच घुसडला व दांडका

माझ्या हातावर घेतला. घंटा वाजली नाहीं. मग घंटा मीच वाजविली आणि माझ्यामुळें होणारा गांधीजींचा एक वेळचा उपवास त्या दिवशीं तरी टळला. त्याच वेळीं मी त्यांना सांगितलें, 'आज आपल्याबरोबर मी सकाळीं फिरावयास येणार आहे.'

त्याप्रमाणें मी त्यांच्याबरोबर फिरावयास गेलों. फिरतांना याबाबत थोडी चर्चा झाली. 'या घंटी वाजविण्याच्या कार्यक्रमाचा माझ्या झोपेवर रात्रभर परिणाम होतो.' मी म्हटलें. 'त्यामुळें माझी प्रकृति बिघडण्याचा संभव आहे. तेव्हां माझ्याकडून हें काम काढून दुसऱ्याकडे सोपवावें.' यावर असें ठरलें कीं मी जर पुन्हां पहाटेच्या प्रार्थनेस अनुपस्थित राहिलों तरच हें काम पुनः मला द्यावयाचें, एरवी नाहीं. त्यानंतर पुनः मी पहाटेची प्रार्थना कधींच चुकविली नाहीं.

□ □ □

**आठवण क्र. २७**

## स्वार्थाला कांहींतरी मर्यादा घालशील की नाहीं ?

साबरमती सत्याग्रहाश्रमांत कांहीं दिवस महात्माजींनीं अशी प्रथा ठेवली होती कीं त्यांना खास कांहींतरी कोणाशीं बोलावयाचें असल्यास त्याला एकट्यालाच ते आपल्याबरोबर, प्रातःकाळच्या प्रार्थनेनंतर, फिरावयास नेत असत आणि सायंकाळच्या प्रार्थनेनंतर जो प्रथम त्यांना तसें सांगत असे, त्यालाच त्यांच्याबरोबर फिरावयास जाण्याची संधी मिळत असे.

गांधीजींची एक संवय होती. सायंकाळच्या प्रार्थनेला जाण्यासाठीं आपल्या खोलींतून बाहेर पडल्याबरोबर ते एकदां समोर दूरवर दृष्टिक्षेप करीत असत. हें मी अनेक वेळां पाहून, निरखून ठेवलें होतें. म्हणून त्यांच्या दृष्टीच्या टप्प्यांत मी येईन अशा बेताने, आगावूंच दूर जाऊन मी उभा राहात असे. त्यांनीं आपल्या पद्धतीनें दूरवर दृष्टिक्षेप करतांच, त्यांचेबरोबर फिरावयास जाण्याचा माझा मानस मी त्यांना माझ्या हाताच्या खुणेनेंच कळवीत असे व तेहि माझी खूण ओळखून मानेनेंच आपला होकार देऊन ठेवीत. माझा हा प्रकार असाच दहाबारा दिवस चालू होता.

त्यांच्याबरोबर सायंकाळीं फिरावयास जाण्यासाठीं वर्दी द्यावी म्हणून कांहीं आश्रमवासी प्रार्थनेमध्यें त्यांच्या शक्य तितक्या जवळ बसण्याची धडपड करीत, पण त्यांना गांधीजींच्याकडून असेंच उत्तर मिळत असें कीं, 'पुंडलीकजीने अिससे पहले कहा है !'

मी त्यांना ही विनंती केव्हां करतो आणि सर्वांच्या आधीं कशी करतो हें कोणालाच कळूं शकलें नाहीं. कारण प्रत्यक्षांत प्रार्थनास्थळीं मी त्यांच्यापासून दूर असे. पण माझी युक्ति महात्माजींच्या लक्षांत आली तरी याबद्दल त्यांनीं कोणापुढें त्याची वाच्यता केली नाहीं. मात्र दहाबारा दिवसानंतर, एके दिवशीं त्यांच्या-बरोबर फिरावयास जाऊन येत असतांना त्यांनी माझ्या कपाळावर प्रेमानें चापटी मारून विचारलें, ' स्वार्थाला कांहींतरी मर्यादा घालशील कीं नाहीं? आज ना उद्यां तुला याची जाणीव होईल या कल्पनेनें मी चार दिवस जाऊं दिलें. उद्यांपासून तुझी ही स्वार्थी प्रथा बंद होईल तर बरें ! ' अर्थात गांधीजींच्या या आज्ञेच्याबाहेर मी जाणें शक्यच नव्हतें. मी माझी प्रथा बंद केली आणि इतर आश्रमवासीयांना गांधीजींच्याबरोबर फिरावयास जाण्याची संधी मिळूं लागली. गांधीजींनीहि आपल्या खोलींतून प्रार्थनेला बाहेर निघतांच एकदां दूर दृष्टिक्षेप करण्याचें बंद केलें. ही गोष्ट पुढें आश्रमांत कळल्यानंतर सर्वांना मौज वाटली.

□□□

**आठवण क्र. २८**

## शेवटीं महाराष्ट्रीय तो महाराष्ट्रीय, जोड्याजवळ बसणार नाहीं !

माझा आश्रमांतील शिक्षणक्रम संपत आल्या वेळीं माझ्या मनांत एक कल्पना आली. आश्रमांतील शेवटचे पंधरा दिवस आपण गांधीजींच्या खोलींत दिवसभर बसावें. म्हणजे ते उभा दिवस काय करतात, त्यांना भेटावयास कोण येतात, त्यांच्याशीं ते कसे बोलतात, आपला पत्रव्यवहार ते कसा सांभाळतात, त्यांचे सेक्रेटरी महादेवभाई देसाई गांधीजींच्या अनेकांशीं होणाऱ्या गाठीभेटींची नोंद कशी ठेवतात, वगैरे कित्येक गोष्टी मला पाहावयास मिळतील व तो एक वेगळा अनुभव आपल्याला मिळेल, म्हणून माझी ही कल्पना मी महात्माजींना सांगितली आणि त्यांची अनुमती मिळविण्याचा प्रयत्न केला.

गांधीजींनीं याला नकार दर्शवीत मला प्रतिप्रश्न केला. याची ' वास्तविक आवश्यकता नाहीं. त्यामुळें आपल्याला कित्येक गोष्टींची माहिती मिळेल आणि कांहीं चांगले संस्कारहि होतील. ही गोष्ट खरी आहे, मग आश्रमांतील इतरांनाहि आळीपाळीनें ही संधी कां देऊं नये? शिवाय माझ्या खोलींत दिवसभर स्वस्थ बसून आपण काय करणार? वेळ कसा घालविणार?

एकादा मनुष्य दिवसांतून बारा तास माझ्याकडे टक लावून पाहात बसेल तर माझेंहि काम मला नीट करतां येणार नाहीं.' गांधीजी हंसत हंसत म्हणाले. तरी देखील एक चरखा घेऊन सूत काढत बसाल तर आपल्यापुरती ही सवलत मी देऊं शकेन. परंतु माझी ही खोली फार लहान आहे. चरखा घेऊन आपण आंत बसल्यास खोलींतील बरीच जागा व्यापली जाईल.' त्या काळीं चरखे मोठ्या चाकाचे असत. लहान व घडीचे चरखे अजून झाले नव्हते. गांधीजी आपलें बोलणें पुढें चालूं ठेवीत म्हणाले, 'माझ्या खोलीच्या दरवाजाबाहेर आपण चरखा घेऊन बसाल तर माझी हरकत नाहीं. तेथून सर्व कांहीं आपणास पाहतां व ऐकतां येईलच. पण एक गोष्ट ध्यानात ठेवा कीं, मला भेटावयास येणारे लोक आपल्याभोवतीं आपापले जोडे सोडतील व त्यांतच आपल्याला बसावें लागेल. पाहा आपणांस ही गोष्ट पसंत पडते कां?'

'मी माझा विचार सोडण्यास तयार आहे. माझी विनंतीहि मीं मागें घेतों. लोक जोडे सोडतात, तेथें बसण्यास माझ मन घेत नाहीं.' माझें हें उत्तर ऐकून गांधीजी हंसून म्हणाले, 'अखेर महाराष्ट्रीय तो महाराष्ट्रीयच! तो जोड्या-जवळ बसणार नाहीं.'

या प्रसंगाची आठवण झाली म्हणजे आज मला असें वाटतें कीं ही संधी मी व्यर्थ अज्ञानानें गमावली. त्यावेळीं मी महात्माजींच्या खोलीच्या दरवाजाबाहेर बसलों असतों तर फार बरें झालें असतें.

□ □ □

आठवण क्र. २९

## यालाच म्हणतात 'योगःकर्मसु कौशलम्'

आश्रमांत नवीन नवीन तरुण कार्यकर्ते येत असत. त्यांच्यामध्यें शारीरिक श्रमाविषयीं चुकारपणा नसता तरच आश्चर्य! त्यावर वारंवार चर्चा चालूच असे. एकदां मी महात्माजींना विचारलें, 'चोवीस तास, बारा महिने केवळ शारीरिक श्रमांतच मनुष्यानें आपलें आयुष्य घालवावें काय? कांहीं लिहिणें वाचणें, अभ्यास करणें याला कांहीं वेळ ठेवाल कीं नाहीं?'

महात्माजींनीं प्रतिप्रश्न केला, 'त्यासाठीं किती वेळ बाजूला काढून ठेवावा. असें आपल्याला वाटतें?'

'निदान तीन तास तरी त्यासाठीं वेळ राखून ठेवला पाहिजे.' मी म्हटलें.

मग आश्रमांतील प्रातःकालापासूनच्या प्रत्येक दोन कार्यक्रमांतील मध्यंतरीचा काळ मोजून पाहण्यास त्यांनीं मला सांगितलें. पहाटें चार वाजतां पहिली घंटा होते. तेव्हांपासून प्रार्थना प्रत्यक्ष सुरू होईपर्यंत सर्व वेळ आपल्याला शौचमुखमार्जनाला लागतो काय? कोणाला त्यांत दहा मिनिटें उरत असतील, तर दुसऱ्या कोणाला पंधरा किंवा वीस मिनिटे शिल्लक राहात असतील. प्रार्थना आटोपून सकाळच्या नास्त्यापर्यंतचा वेळ बराच असतो. तो सर्व वेळ स्नान, कपडे धुणें यांत खर्च होतो काय? त्यांत कमीत कमी २० मिनिटें तरी प्रत्येकास आपल्या आवडीच्या कामात खर्च करता येण्यासारखी सहज असतात. अशा रीतीनें मिनिटांचा हिशोब जमा करून महात्माजींनीं मला दाखवून दिलें की लिहिणें–वाचणें व अभ्यास करणें या कामीं कमींत कमी साडेतीन तास मिळूं शकतील.

'पण अशा रीतीने मिळालेल्या फुटकर मिनिटांमध्यें अभ्यासासाठीं चित्त एकाग्र कसें होऊं शकेल?' मी पुनः विचारलें.

'यातच तर खरी मौज आहे. 'योगः कर्मसु कौशलम्' म्हणतात तें यालाच. विद्यार्थ्यांची शाळा चालू असतांना जेवढा व जसा त्याचा अभ्यास होतो तितका अभ्यास दिवाळीच्या किंवा मे महिन्याच्या सुट्टीमध्यें होत नसतो. अगदीं कार्यमग्न असतांना जितकीं महत्त्वाची कामें आपण उरकूं शकतो तितके काम संपूर्ण फुरसतीच्या वेळीं आपल्या हातून होत नसतें. ही कामाची टुक मनुष्याला एकदां साधली की त्याला वेळ मिळत नाहीं अशी अडचण पुढें कधीं येत नाहीं.

□ । □

**आठवण क्र. ३०**

## ही बुद्धि चांगल्या मार्गाला लागली तर या लोकांचें व देशाचें किती कल्याण होईल?

सन १९२४ च्या बेळगांव कॉंग्रेसच्या अधिवेशनाच्या दिवसांतील गोष्ट. कॉंग्रेस अधिवेशन व अशाच मोठमोठ्या परिषदांच्या वेळीं सभासद अथवा प्रतिनिधींच्या आगमनापूर्वीं खिसेकापू लोक येत असतात. १९२४ च्या बेळगांव अधिवेशनांतील स्वयंसेवकांच्या प्रमुख स्थानीं डॉ. ना. सु. हर्डीकर यांची नेमणूक झाली होती. स्वयंसेवकांनीं चोख व्यवस्था ठेवलेली होती. त्यांच्या

कार्यतत्परतेमुळें ब-याच खिसेकापूंना पकडण्यांत आलें होतें. महात्माजींच्या झोपडीजवळच एका तंबूमध्यें त्या सर्व खिसेकापूंना बसविण्यांत आलें होतें. महात्माजींना थोडी फुरसद मिळतांच त्यांना या लोकांच्या तांड्यामध्यें बोलावून आणलें. महात्माजी त्या तंबूमध्यें आले. त्यांनीं त्या खिसेकापू लोकांना अत्यंत कळकळीनें उपदेश केला, जणू कांहीं भलत्या मार्गाला लागलेले हे आपलेच अगदीं जवळचे नातेवाईक आहेत ! ! इतका आपलेपणा त्या सदय उपदेशांत भरलेला होता.

हे लोक अगदीं निर्ढावलेले व बिलंदर असतात. त्यांच्यापैकीं कांहींनीं तर उभे राहून ' मी हा असला धंदा पुनः करणार नाहीं ' अशी प्रतिज्ञा करण्यासहि कमी केलें नाहीं. त्यांच्या त्या प्रतिज्ञेचें पुढें दुस-या क्षणींच काय होणार होते ही गोष्ट कोणालाहि स्पष्ट दिसण्यासारखी होती व झालेंहि तसेंच.

एका खिसेकापूने तर एक चोरून आणलेलें घड्याळ दाखवून म्हटलें माझ्या जवळ या धंद्यांतील अशी कला आहे कीं हें घड्याळ ज्याचें त्यास पोचवा आणि उद्या संध्याकाळच्या आंत मी तें पुनः चोरून आणून दाखवितों. '

हा त्याचा आत्मविश्वास व उद्गार ऐकून महात्माजी म्हणाले, ' अरेरे, या लोकांची ही शक्ति व्यर्थ वाया जात आहे ! ही बुद्धि चांगल्या मार्गाला लागली तर या लोकांचें आणि देशाचें किती कल्याण होईल ! अशा गोष्टींचा अभिमान धरण्यापेक्षां हा चोरीचा धंदा सोडून शरीरश्रम करून पोट भरा. त्यानेंच तुमचें इहपरलोकीं कल्याण होईल. ' असें अत्यंत कळकळीनें सांगून महात्माजी तेथून निघून गेले. त्यानंतर सर्व खिसेकापूंना स्वतःला सुधारण्याची एक संधी देण्यासाठीं मोकळें सोडण्यांत आलें. पोलिसांची त्यांच्यावर नजर होतीच आणि स्वयंसेवकांचेंहि त्यांच्यावर पूर्ण लक्ष होतें. त्यानंतर बेळगांव कॉंग्रेस अधिवेशन दोन दिवसांतच पुढें संपल्यामुळें सर्वच कामें संपुष्टांत आलीं.

□ □ □

आठवण क्र. ३१

## गांधीजी आणि घातपात

बेचाळीस सालच्या 'छोडो भारत' चळवळीपासून चळवळींत घातपात मोठ्या प्रमाणावर होण्यास प्रारंभ झाला. त्यावेळीं मी सांगलींत भूमिगत राहून ( बुलेटिन ) चळवळीसंबंधीं हस्तपत्रकें काढीत होतों. हा चळवळींतील घातपाताचा प्रकार

गांधीजींच्या विचारांत बसत नाहीं, हा प्रकार गांधीजींना आवडणार नाहीं, त्यायोगें त्यांना दुःख होईल, असेंच मला वाटत होतें व तशा आशयाचें एक हस्तपत्रक काढून मी प्रसिद्धहि केलें होतें. तोंपर्यंत मी भूमिगत असलों तरी मी माझ्या पोशाखांत बदल केलेला नव्हता. माझा वेष पालटलेला नव्हता. त्यामुळें माझें हें हस्तपत्रक पहिलें आणि शेवटचेंच होणार होतें. पण त्यानंतर श्रीमान् किशोरलालभाई मूश्रूवाला यांनी ही घातपाताची लाट उचलून धरली व आशीर्वादही दिला. मला वाटलें कीं, किशोरलालजी पुढें माझें गांधी–विचारांचें ज्ञान कितीसें असणार ? म्हणून मी पुनः नव्या विचारानें सांगलीमध्येंच हस्तपत्रकें काढावयास प्रारंभ केला व प्रो. शहा नांवाच्या एका गृहस्थानें तीं राजरोस छापवून देण्याची मदत केली. सांगलीचे श्री. वेलणकर यांनीं आपल्या कारखान्यांतून रेल्वे लाईनच्या फिश प्लेट्स काढण्याचे पान्हे तयार करून दिले होते. त्यानंतर मी पंधरा हस्तपत्रकें छापवून प्रसिद्ध केलीं. त्यांत रेल्वे गाडी कशी व कोठें पाडावी, स्टेशनें कशीं जाळावींत यांचा उहापोह केला होता.

तीं सर्व हस्तपत्रकें घेऊनच मी चळवळ संपल्यानंतर गांधीजींच्या भेटीसाठीं पुण्यामध्यें गेलों होतों. तेथें राजगोपालाचार्य तथा राजाजीहि आले होते. त्यांनीं मला सहज विचारलें, ‘ तुम्ही या आंदोलनांत कोणता भाग घेतला होता ? ’

‘ भूमिगत राहून मी अडीच महिने ‘ बुलेटिन्स ’ काढीत होतो ’ असें सांगून मी काढलेलीं हस्तपत्रकें त्यांना सादर केलीं आणि ‘ किशोरलालजींच्या मार्गदर्शनाप्रमाणें मी या घातपाती मार्गांत पडलों.’ असें म्हटलें. किशोरलालजींचें नांव माझ्या तोंडून निघतांच राजाजी मला गांधीजींच्याकडे घेऊन गेले. गांधीजी जवळच्याच हॉलमध्यें बसले होते. राजाजी गांधीजींना म्हणाले, ‘ हें पाहा, एका आश्रमवासीयाचें उदाहरण ! ’

मग गांधीजींनीं मला विचारलें. ‘ तुम्ही या आंदोलनांत काय करीत होता तुम्ही भूमिगत झाला होता काय ? ’

‘ होय. मी भूमिगत झालों होतों ! ’

‘ वेष पालटून तुम्ही वावरत होता काय ? हें तुम्ही कसें करूं शकतां ? ’

मी गांधीजींना माझें पहिलें हस्तपत्रक दाखविलें आणि म्हटलें कीं, ‘ किशोरलालजींनीं ही घातपात पद्धति उचलून धरलेली पाहिल्यानंतर, मला वाटलें कीं, किशोरलालभाईपेक्षां मला ‘ गांधीविचार ’ अधिक समजतों काय ?

त्यांनीं केलेलें मार्गदर्शन स्वीकारूनच मी त्यानंतरचीं बुलेटिन्स काढलीं आहेत हीं तीं सर्व बुलेटिन्स आहेत.'

'मी स्वतः हिंसेला अहिंसा म्हणूं लागल्यास तुम्ही मलाहि विरोध करावयास पाहिजे, अशी माझी आश्रमवासीया कडून अपेक्षा होती व आहेहि! मग आश्रमवासीयांनींच असा घातपात आरंभला तर याचा अर्थ काय होईल?' गांधीजी उत्तरले.

त्यानंतर या बाबतींत ब्रिटिश सरकारशीं गांधीजींचा बराच मोठा पत्रव्यवहार झाला. किशोरलालजींना सरकारची क्षमायाचना करण्याचें मार्गदर्शन गांधीजींनीं केलें. किशोरलालजींनींहि त्यांच्या आज्ञेप्रमाणें केलें. गांधी व सरकारमध्यें झालेला हा सर्व पत्रव्यवहार सायक्लोस्टाईल करून त्याच्या प्रती कांही पुढाऱ्यांकडे पाठविल्या होत्या. त्यांतील एक प्रत कै. गु. गंगाधरराव देशपांडे यांच्याकडेहि आलेली होती. सन १९४२ च्या स्वातंत्र्य लढ्यामध्यें हे राजकीय घातपात (सॅबोटेज) झाले नसतें तर अधिकच चांगलें झालें असतें. निदान वाईट तरी कांहीच झालें नसतें, असें गांधीजींचें ठाम मत होतें. राजकीय आंदोलनामध्यें ही घातपात पद्धति एकदां शिरली ती तेथें आतां कायमचें घरच करून बसली आहे.

□□□

आ ठ व ण क्र. ३२

## गांधीजींच्या संदेशाचें रेकॉर्ड घ्यावें व त्याचा चोहोंकडे प्रचार करावा.

दांडी मार्चच्या वेळची गोष्ट. साबरमती सत्याग्रहाश्रमांत कॉंग्रेस वर्किंग कमिटीची बैठक भरलेली होती. मी त्या वेळीं कै. गु. गंगाधरराव देशपांडे यांच्याबरोबर साबरमतीस गेलों होतों. भोजनासाठीं पानें मांडून वाढण्याचें काम चालू झालेलें होतें.

माझ्या मनांत आलें कीं, दांडी मार्च प्रत्यक्ष सुरू होतांच ब्रिटिश सरकार गांधीजींना खात्रीनें अटक करणार यांत शंका नाहीं. तेव्हां गांधीजींच्या शेवटच्या संदेशाचें एक रेकॉर्ड घ्यावें व त्याचा गांवगन्ना खेडोपाडीं प्रचार करावा. माझी ही कल्पना मी राजाजींना सांगितली. त्यांना ती पंसत पडली असें मला वाटलें. तेथेंच राजेंद्रप्रसादजी बसलें होतें. (पुढें ते राष्ट्रपति झाले.) त्यांच्या

कानावर ही गोष्ट गेली. ते मला म्हणाले, ‘ चला, आपण बापूजींकडे जाऊं व त्यांना तुमची रेकॉर्डची कल्पना सांगू या. ’

मला वाटत होतें कीं, राजेंद्रबाबूजी बापूजींना ती कल्पना आपली म्हणून सांगतील, म्हणून त्या गोष्टीला मी होकार दिला होता. पण प्रत्यक्ष बापूजी-पुढे आम्ही जेव्हां उभे राहिलों, तेव्हां राजेंद्रप्रसादजी म्हणाले, ‘ बापूजी, हे पुंडलीकजी आपल्यापुढे एक कल्पना मांडूं इच्छितात ! ’

‘ बोलो, क्या बात है ? ’ गांधीजींनी मला विचारलें.

मी माझी कल्पना थोड्या विस्ताराने गांधीजींना सांगितली. त्यावर मला उद्देशून ते म्हणाले, ‘ तुम्ही पूर्वीं गीतेवर प्रवचनें देत फिरत होता ना ? त्या-वेळीं गीतेचें चिंतन-मनन करीत होता का गाढवे वळत होता ? माझ्या संदेशांत कांहीं अर्थ असेल तर कोणीहि प्रचार न करतांच त्याचा जगभर प्रसार होईल. आणि त्या संदेशांत कांहींच राम नसेल तर रेकॉर्ड्सद्वारा कितीहि प्रचार केला तरी त्याचा कांहींहि परिणाम होणार नाहीं. तुम्ही ग्रामोफोन कंपनीची एजन्सी तर घेतलेली नाहीं ना ? ’

डोळे उघडले. लख्ख प्रकाश पडला. मी एक धडा शिकलो. राजेंद्रबाबूजी आणि मी निमूट आपापल्या पानावर जेवणासाठीं निघून गेलों.

□ □ □

REFBK-0017782

मराठी ग्रंथ संग्रहालय
१५५८६

## श्री. पुंडलीकजी कातगडे यांचीं प्रकाशित झालेलीं पुस्तकें

१) मिरज सारावाढ व रयतांचा सत्याग्रह .... .... २-००
२) जोहार (मराठी) .... .... .... .... २-००
३) जौहर (हिंदी) .... .... .... .... .... २-००
४) हिंदी शिक्षक अर्थात स्वराज्याच्या भाषेशीं परिचय .... १-५०
५) आजरे तालुक्यांतील सारावाढ व रयतांचा सत्याग्रह .... २-००
६) हिंदी-मराठी-शब्दकोश (२५००० शब्द) .... २-००
७) 'अनुग्रह' .... .... .... .... .... ५-००
८) संस्मरणीय पर्व .... .... .... .... .... १०-००
९) कै. गोविंदराव याळगी यांचें चरित्र .... .... .... १०-००
१०) 'पुंडलीक' अर्थात् पुंडलीकजींच्या जीवनांतील आठवणी ८-००
११) कन्नड-मराठी शब्दकोश (३६००० शब्द) .... १५-००
१२) गांधीजींच्या सहवासांत (मराठी) .... .... .... १-५०
१३) 'राष्ट्रीय कीर्तनकार डॉ. पटवर्धनबुवा यांची विचारधारा व शिकवण'.... .... .... .... .... .... ५-००
१४) 'पुंडलीक' पुस्तकांतील निवडक भागांचा अनुवाद इंग्रजीमध्यें करवून कॅलीफोर्निया प्रेसनें छापवून प्रकाशित केला आहे 'Five Brahmins' .... .... ३०-००
१५) गांधीजींच्या सहवासमें (हिंदी) .... .... ... १-५०
१६) बादशाह अब्दुल गफारखान यांचें चरित्र (हिंदी) .... १५-००

## श्री. पुंडलीकजी कातगडे यांचीं आगामी पुस्तकें

१) 'गांधी दर्शन' अर्थात् गांधीजींचा आध्यात्म-जीवनयोग (मराठी)
२) 'गांधी दर्शन' अर्थात् गांधीजी आध्यात्म-जीवनयोग (हिंदी)
३) 'पुंडलीक' अर्थात् पुंडलीकजींच्या जीवनांतील आठवणी (हिंदी)
४) मराठी-कन्नड शब्दकोश (४०,००० शब्द)
५) कन्नड-मराठी भाषा परिचय
६) कै. गोविंदराव याळगी यांचें चरित्र (हिंदी)

ग्रंथ ७१३५० अनुक्रम ९४५ ९२५।८